कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६


किंमत ४ ₹

B.com Computer
रिसेप्शनिस्ट महिला पाहिजे. अनुभवाची अट नाही. वेटर/रुमबॉय व महिला पाहिजेत. अर्जासह भेटा.
साई-इन रिसॉर्ट चोंढी, अलिबाग-रेवस रोड अलिबाग

## श्रद्धा बोऱ्हाडे यांना पोलीस कोठडी

**आगरदांडा :** मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर काम करणाऱ्या श्रद्धा बोऱ्हाडे यांना २ लाख ५० हजार रुपयाची लाच स्वीकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले होते. त्यांना न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. एका ठेकेदाराने मुरुड शहराजवळ असणाऱ्या एकदरा, राजपुरी, खोकरी येथील गावातील रस्त्यालगत स्लॅब ड्रेनचे काम पूर्ण केले होते. हे काम पूर्ण झाल्यावर झालेल्या कामाचे पूर्ण बिल अंदाजपत्रकासह तयार करून देण्याकरिता कनिष्ठ अभियंता श्रद्धा बोऱ्हाडे यांनी तक्रारदार यांच्याकडून पान २ वर

# ‘एलिफंटा’वर सापडले १५०० वर्षांपूर्वीचे जलाशय



दत्तात्रेय म्हात्रे

। चिरनेर ।

**वर्ल्ड हेरिटेज म्हणून ओळख असलेल्या एलिफंटा बेटावर मागील चार महिन्यांपासून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून उत्खनन सुरू आहे. या उत्खननादरम्यान सुमारे १५०० वर्षांपूर्वीचे मानले जाणारे दगड व विटांनी बांधलेले जलाशय तसेच विविध पुरातन वस्तू आढळून आल्या आहेत. त्यामुळे इतिहासावर अधिक स्पष्ट प्रकाश पडेल.**

या जलाशयांची रचना पाहता त्या काळातील जलव्यवस्थापन आणि अभियांत्रिकी कौशल्य किती प्रगत होते, याचा प्रत्यय येतो. या शोधामुळे एलिफंटा बेटाच्या इतिहासातील अनेक अनुत्तरित प्रश्नांना नवे उत्तर मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. अभिजीत आंबेकर यांनी सांगितले, या उत्खननातून सापडलेल्या वस्तू अत्यंत दुर्मिळ असून, पुढील संशोधनानंतर बेटाच्या भारतीय पान २ वर

### हा शोध महत्त्वाचा का आहे?

एलिफंटा बेट हे प्रामुख्याने खडकात कोरलेल्या अद्भुत वास्तूंसाठी ओळखले जाते. यापूर्वीही येथे पाण्याचा साठा करण्यासाठी वापरली जाणारी अशीच काही टाकी आढळून आली होती. परंतु, येथे पाण्यासाठी अत्यंत विचारपूर्वक आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेली वास्तू रचना पाहायला मिळते. बेटावर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात पडत असले तरी येथील जमिनीचा पृष्ठभाग खडकाळ असल्यामुळे पाण्याचा जमिनीत झिरपण्याचा वेग अत्यंत कमी असतो; परिणामी, बहुतांश पाणी वाहून जाऊन थेट समुद्रात मिळते. पावसाळ्यानंतर पाणी टंचाईवर मात करण्यासाठी अशा प्रकारच्या जलसाठवणूक वास्तूंची गरज भासते.

### कुंडं की पायऱ्यांची विहिर?

तज्ज्ञांच्या मते, या वास्तूला केवळ कुंड म्हणून वर्गीकृत करता येणार नाही; कारण हे जलाशय कोणत्याही मंदिराला जोडून बांधलेले नाही. ते या वास्तूची तुलना पायऱ्यांच्या विहिरींशी करतात. विशेषतः गुजरात आणि राजस्थानमध्ये आढळणाऱ्या अशा विहिरींशी, जिथे पायऱ्या उतरून गेल्यावर मध्यभागी असलेल्या मुख्य जलाशयापर्यंत पोहोचता येते. अशा प्रकारच्या वास्तू रचनेचा उगम साधारणपणे इसवी सनाच्या ७ व्या शतकात झाला असावा, असे मानले जाते. या शोधामुळे या संकल्पनेचा स्थानिक प्रकार आणि या प्रदेशात तिचा विकास कसा झाला, याविषयीच्या आकलनात भर पडू शकेल, असे डॉ. आंबेकर यांनी नमूद केले.

## वेधक

### कोकण विभागीय आयुक्तपदी अग्रवाल



**रायगड :** विजय सुर्यवंशी यांच्या बदलीनंतर प्रभारी कोकण विभागीय आयुक्त म्हणून सिद्धराम सालीमठ यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली. अखेर कोकण विभागीय आयुक्त म्हणून सनदी अधिकारी रुबल अग्रवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोमवारी (दि. ३०) त्यांनी आयुक्तपदाची सुत्रे हाती घेतली. यापूर्वी महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पान २ वर

### खरातला १४ दिवसांची कोठडी

**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्याला बुधवारी (दि.१) नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते. अशोक खरातची पोलीस कोठडी संपल्याने त्याला न्यायाधीश बी. इन. ईचपुरानी यांच्या कोर्टात हजर केले होते. सध्या एसआयटीकडून अशोक खरातची चौकशी सुरु आहे. या चौकशीत अनेक धक्कादायक माहिती समोर आली. अशोक खरातविरोधात नव-नव्या तक्रारी दाखल होत आहेत. अशोक खरातने केलेले लैंगिक शोषण, अनेकांना घातलेला आर्थिक गंडा आणि इतर अनेक कारनाम्यांची जंत्री वाढतच चालली आहे. त्यामुळे अशोक खरातची कोठडी वाढवण्याची मागणी एसआयटीकडून करण्यात आली.

### लाडक्या बहिणींना दिलासा

**मुंबई :** महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत वाढविली असल्याची माहिती दिली. माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीसाठी यापूर्वी ३१ मार्चपर्यंत होती. आता ही मुदत एक महिन्याने वाढविण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील लाडक्या बहिणींना ई-केवायसी दुरुस्तीसाठी शेवटची संधी देण्यात येत असल्याचे देखील आदिती तटकरे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र सरकारकडून जुलै २०२४ पासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ दरमहा १५०० रुपयांप्रमाणं महिलांना दिला जातो.

# महसूल विभागाची 238 पदे रिक्त

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

गाव पातळीवर काम करणाऱ्या महसूल विभागातील मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांची २३८ पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. फेरफार नोंदी मंजूर करणे. सरकारी योजनांची अंमलबजावणी करणे. वारस नोंदी करणे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात पिकांच्या नुकसानीचा पंचनामा करणे. गावातून जमीन महसूल व सरकारी थकबाकी वसूली करणे, अशा अनेक ग्रामीण भागातील कामांवर रिक्तपदांचा परिणाम होत आहे.

महसूल विभागातील तलाठी आणि तहसीदार यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणून मंडळ अधिकारी यांच्याकडे पाहिले जाते. कार्यक्षेत्रातील तलाठ्यांच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे. जमीन महसूल, फेरफार नोंदी मंजूर करणे. सरकारी योजनांची अंमलबजावणी करणे. वारस नोंदी करणे. तालुक्याच्या प्रशासनात महत्वाची भुमिका बजावणे. जमीनीच्या खरेदी विक्रीनंतर तलाठ्यांनी घेतलेल्या फेरफार नोंदी तपासून मंजूर करणे, नुकसानीचा अहवाल तहसीलदार अथवा उपजिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणे इत्यादी महत्त्वाची कामे मंडळ अधिकारी यांच्याकडून पार पडतात. मात्र, रायगड जिल्ह्यामध्ये मंडळ अधिकारी यांची ९० पदे मंजूर असून ७६ पदे भरण्यात आली आहे. उर्वरित १४ पदे अद्याप भरली नाहीत.

**ग्रामीण भागावर अपूऱ्या कर्मचाऱ्यांचा परिणाम**

**रिक्तपदांवर दृष्टीक्षेप**

| पद | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| मं. अधिकारी | ९० | ७६ | १४ |
| तलाठी | ५१० | ४०४ | १०६ |
| कोतवाल | ३५१ | २३३ | ११८ |
| एकूण | ९५१ | ७१३ | २३८ |

शासनाच्या महसूल विभागातील गाव पातळीवर काम करणारे महत्वाचे कर्मचारी म्हणून तलाठी हे पद आहे. सातबारा उतारा, आठ अ फेरफार, उत्पन्न दाखल्यासाठी पंचनामा, जन्म मृत्यूची नोंद ठेवणे. जमिनीची माहिती ठेवणे. गाव नमुने अद्यायावत ठेवणे, पिकांची पाहणी करणे. शेतकऱ्यांना दाखले देणे. इतर शासकीय करांची वसूली करणे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात पिकांच्या नुकसानीचा पंचनामा करणे. निवडणुका, जनगणना कामात मदत करणे. आपत्कालीन परिस्थितीत गावांची माहिती घेणे ही कामे तलाठ्यांमार्फत केली जातात. सध्या ग्राम महसूल अधिकारी या नावाने तलाठ्यांना ओळखले जाते. मात्र, तलाठ्यांची ५१० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४०४ पदे भरण्यात आली असून १०६ पदे रिक्त आहेत.

कोतवाल हे ग्रामीण महसूल प्रशासनातील शेवटचे महत्वाचे पद आहे. तलाठी आणि ग्रामस्थ, शेतकरी यांच्यामधील दुवा म्हणून कोतवाल काम करतात. महसूल गोळा करणे, दवंडी करणे, प्रशासकीय कामात मदत करणे, शासकीय योजना तलाठ्यांच्या मदतीने गावोगावी पोहचविणे, गावातून जमीन महसूल व सरकारी थकबाकी वसूलीमध्ये तलाठ्यांना मदत करण्याचे काम कोतवाल करतात. गावभेटीवर येणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना मदत करणे व मानधनावर काम करणारी ही यंत्रणा आहे. जिल्ह्यामध्ये कोतवालांची ३५१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २३३ पदे भरली असून ११८ पदे रिक्त आहे.

महसूल विभागात गाव पातळीवर काम करणाऱ्या मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांची एकूण २३८ पदे शासनाकडून अद्याप भरली नाहीत. त्यामुळे कार्यरत अधिकारी व पान २ वर

**अतिरिक्त ताण**

एका तलाठ्याकडे दोन ते तीन सजांचा कारभार सोपविला जात आहे. त्यामुळे असंख्य गावे वाड्यांमधील कामकाज पाहताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तलाठ्यांसह मंडळ अधिकारी यांना देखील गाव पातळीवरील महसूली कामे करताना अडचणी निर्माण होत आहेत. एकाच अधिकारी व कर्मचाऱ्यावर अनेक गावांतील कामकाजाची जबाबदारी असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची धावाधाव होत आहे. शासनाने दिलेल्या योजनांचे नियोजन करून ते घराघरात पोहचविणे कठीण होते. त्याचा भार अनेकवेळा कोतवालावर सोपविला जातो.

# माथेरान घाटरस्त्यात मिनीबसमध्ये बिघाड

## चालकाच्या प्रसंगावधानाने प्रवासी वाचले



। कर्जत । प्रतिनिधी ।

माथेरानयेथील नारीकांना तसेच विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात प्रवास उपलब्ध व्हावा म्हणून नेरळ-माथेरान घाटात ऑक्टोबर २००८ मध्ये मिनीबस सेवा सुरू करण्यात आली होती. सुरवातीच्या काळात सुरळित सुरू असलेल्या या सेवेला गेल्या १० वर्षांपासून ग्रहण लागले आहे. त्यातच बुधवारी (दि.१) सकाळी कर्जत येथून माथेरानसाठी निघालेल्या मिनीबसचा पान २ वर

### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक बुधवारी (दि.१) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात आली. आठवी ते बारावीच्या दिव्यांग विद्यार्थांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

## जिल्ह्यात आज हनुमान जन्मोत्सवाचा जल्लोष



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रामनवमीनंतर रायगड जिल्ह्यात श्री हनुमान जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. या उत्सवाची तयारी पुर्ण झाली असून भाविक हा उत्सव साजरा करण्यासाठी सज्ज झाले आहेत. जिल्ह्यात गुरुवारी (दि.२) हनुमान उत्सवानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव जिल्ह्यामध्ये ६०६ ठिकाणी साजरा होणार आहे. या निमित्ताने कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रायगड पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असणार आहे.

जिल्ह्यामध्ये श्रीराम जन्मोत्सव काही दिवसांपूर्वी पान २ वर

# श्रीवर्धनमध्ये ‘राजकीय भूकंप’?



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात येत्या १२ एप्रिल रोजी मोठी राजकीय उलथापालथ होण्याची चिन्हे दिसत आहेत. अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या भागात आता राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. केवळ उलथापालथी नसून, संपूर्ण सत्तासमीकरणे उद्ध्वस्त करणारा ‘राजकीय स्फोट’ ठरणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. अनेक वर्षे अभेद्य मानला गेलेला राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला आता ढासळण्याच्या शेवटच्या टप्प्यावर असल्याचे संकेत मिळत आहेत.

गोपनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील काही ‘किंगमेकर’ नेते मोठा राजकीय स्फोट करण्याच्या तयारीत असून, एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर पक्षत्याग होण्याची शक्यता आहे. हा धक्का एवढा जबरदस्त असेल की, राष्ट्रवादी काँग्रेसची स्थानिक पातळीवरील पकड पूर्णपणे कोलमडू शकते, असे राजकीय जाणकारांचे स्पष्ट मत आहे. स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष उसळला असून, ‘आता सहनशक्ती संपली’, अशी उघड प्रतिक्रिया समोर येत आहे. विकासकामांतील ढिसाळपणा, नेतृत्वातील गटबाजी आणि जनतेपासून वाढत चाललेली दुरावस्था या सर्वांचा एकत्रित उद्रेक १२ एप्रिलला होणार असल्याचे बोलले जात आहे. त्या दिवशी होणारा भव्य मेळावा हा केवळ कार्यक्रम नसून, सत्तेला थेट आव्हान देणारा शक्तिप्रदर्शनाचा महायज्ञ ठरणार आहे. हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, समर्थक आणि नाराज नेते एकाच व्यासपीठावर येणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. मोठमोठ्या घोषणा, थेट हल्ले, आणि राजकीय नकाशाच बदलून टाकणारे निर्णय या सर्वांची ‘काउंटडाउन’ सुरू झाली आहे.

विरोधकांनीही या परिस्थितीचा फायदा घेत श्रीवर्धनमध्ये सत्ता बदल अटळ आहे, असा आक्रमक सूर लावला आहे. काहींनी तर थेट दावा केला आहे पान २ वर

### श्रीवर्धनमध्ये बिबट्याचा हैदोस

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

गेल्या दोन-तीन महिन्यांपासून श्रीवर्धन तालुक्यात बिबट्याने अक्षरशः दहशत माजवली असून, प्रशासनाच्या सुस्त कारभारामुळे आता नागरिकांच्या संयमाचा बांध सुटला आहे. तालुक्यातील वडघर येथे बिबट्याने थेट लोकवस्तीत घुसून एका गायीवर हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने परिसरात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.३० मार्च रोजी संध्याकाळच्या सुमारास वडघर येथील शेतकरी बबन सालदुरकर यांच्या गोठ्यात बिबट्याने अचानक झडप घातली. यावेळी बिबट्याने थेट गायीच्या तोंडावर पान २ वर

# आवासच्या ग्रामसेवकाला दणका

## २१ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

आवास येथील विविध कामांची माहिती मागविण्यात आली होती. माहितीच्या अधिकारानुसार ही माहिती देण्यास विलंब केल्याचा ठपका आवासचे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी नारायण तुकाराम म्हात्रे यांच्यावर ठेवण्यात आला. त्यांच्याविरोधात माहिती आयुक्त यांनी कारवाई करून २१ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. तसेच, माहितीच्या शुल्कातील केलेला २ हजार ५३० रुपयांचा भरणा अपिलार्थी यांना परत करण्यात यावा, असे लेखी आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आवासच्या ग्रामसेवकाला दणका मिळाला आहे.

अलिबाग तालुक्यातील आवास येथील ग्रामस्थ मच्छिंद्र कवळे यांनी, ग्रामपंचायत टॅक्स फी किंवा इतर येणे असलेल्या रकमेबाबत सविस्तर माहिती मिळावी. तसेच, १ एप्रिल, २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत संबंधित विषयांकीत प्रकरणे व एकूण येणे असलेल्या मिळकतघर, खातेकर यांची सविस्तर माहिती, टॅक्स फी येणे करीता वाटप केलेले एकूण बीलांची साक्षांकीत प्रत मिळावी यासाठी दि.१९ एप्रिल, २०२२ मध्ये माहितीच्या अधिकारात माहिती मागविली होती. मात्र, ही माहिती ग्रामविकास अधिकारी म्हात्रे यांनी मुदतीत न दिल्याने राज्य माहिती आयुक्त यांच्या दालनात यावर सुनावणी झाली. अखेर ग्रामविकास अधिकारी म्हात्रे यांच्यावर विलंबाचा ठपका ठेवत त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी नारायण तुकाराम म्हात्रे (सेवा निवृत्त) यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. त्यामुळे त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना १५ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशातील माहितीचा अधिकारी अधिनियम २००५च्या कलम २०(१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत असून त्यांच्यावर २१ हजार रुपयांची शास्ती लादण्यात येत आहे. तसेच, अपिलार्थी कवळे यांनी ग्रामपंचायतीकडे माहितीसाठी केलेला २ हजार ५३० रुपयांचा भरणा ३० दिवसांच्या आत धनादेशाद्वारे परत करण्यात यावा, असे आदेश काढण्यात आले आहेत.

**बँकेचा नफा ८७ कोटी | व्यवसाय ७,१०५ कोटींच्या पुढे**

# आरडीसीसी बँकेची सातत्यपूर्ण कामगिरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने २०२५-२६ या आर्थिकवर्षाअखेर आपला एकूण व्यवसाय तब्बल ७१०५.३३ कोटी इतका नोंदवित ८७.१५ कोटीचा ढोबळ नफा कमविला आहे. विशेष म्हणजे मागील आर्थिक वर्षात देखील बँकेचा नफा ८० कोटींपेक्षा अधिक होता. बँकेच्या इतिहासातील ही ऐतिहासिक वाढ असून बँकेच्या ठेवी ४०३७.१४ कोटी तर एकूण कर्ज ३०६८.१९ कोटी इतके झाले आहे. बँकेने आपल्या स्वनिधीचे आकडे सुद्धा जाहीर करताना तब्बल ७७७.१० कोटी इतक्या रकमेची नोंद स्वनिधी म्हणून केली आहे. गेल्या चार आर्थिक वर्षाचा कामगिरीचा आढावा लक्षात घेता बँकेने सन २०२२ पासून २०२६ पर्यंत एकूण व्यवसाय ३८४६.५८ कोटी रुपयांवरून ७१०५.३३ कोटी रुपयांपर्यंत वाढून सुमारे ८५ टक्के वृद्धी बँकेने साध्य केली आहे.

विशेष म्हणजे, बँकेने २०२५-२६ हे आर्थिक वर्ष ‘डिपॉझिट ग्रोथ वर्ष’ म्हणून घोषित केले होते. आपली बँक या भावनेतून शेतकरी, उद्योजक, व्यापारी, स्वयंरोजगारधारक तसेच सर्वसामान्य बचतदार मोठ्या संख्येने या अभियानाशी जोडले गेले. स्थानिक पातळीवरील या विश्वासाच्या पायावरच बँकेची वाटचाल राज्याच्या सीमा ओलांडत देशपातळीवरील अग्रगण्य सहकारी बँकांमध्ये गणली जाऊ लागली आहे. रिझर्व्ह बँक व नाबार्ड सारख्या प्रमुख वित्तीय संस्थांकडून बँकेच्या कार्यपद्धतीची दखल घेतली जात असून, संस्था संगणकीकरण देशातील पहिली जिल्हा बँक आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांना राज्य शासनाचा बेस्ट सीईओ पुरस्कार हे या आर्थिक वर्षातील बँकेच्या गौरवपूर्ण कामगिरीचे भाग राहिले.

बँकेचे मुख्य पान २ वर




ग्राहकांचा विश्वास, संचालक मंडळाची दूरदृष्टी आणि कर्मचाऱ्यांची निष्ठा यामुळे बँकेने ही ऐतिहासिक कामगिरी साध्य केली आहे. ‘डिपॉझिट ग्रोथ वर्ष’ या संकल्पनेला मिळालेला प्रतिसाद हा केवळ आर्थिक यश नसून, तो बँक आणि ग्राहक यांच्यातील दृढ नात्याचे प्रतीक आहे. आगामी काळातही ग्राहककेंद्रित आणि विश्वासार्ह सेवा अधिक सक्षम करण्यावर आमचा भर राहील, असे आरडीसीसी बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले.



# उन्हात ताडगोळ्यांचा आधार

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जिल्ह्यामध्ये सध्या तापमान वाढले असून उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या उन्हाच्या चटक्यापासून बचाव करण्यासाठी वेगवेगळा प्रयत्न केला जात आहे. त्यात शरीरात गारवा मिळावा, यासाठी ताडगोळे खरेदीवर अधिक भर दिला जात आहे. त्यामुळे ताडगोळ्याला प्रचंड मागणी वाढली आहे. त्यामुळे मानवी आरोग्यासाठी ताडगोळ्याचा आधार मिळत आहे.



सध्या हवामानात अमुलाग्र बदल झाला आहे. उन्हाचे चटके दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे बाहेर पडणेदेखील नकोसे झाले आहे. उन्हाच्या चटक्यापासून बचाव करण्यासाठी काहीजण मफलर, स्कार्पचा वापर करीत आहेत. काही जण गॉगल तर काही जण सावलीचा आधार घेत आहेत. या वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा त्रास होण्याची भिती आहे. त्यामुळे शरीरावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उन्हाच्या या कालावधीत ताडगोळे शरीरासाठी खुप उपयुक्त ठरत आहेत. आरोग्यासाठी गुणकारी असलेले तोडगोळे विक्रीला अलिबागसह अन्य ठिकाणी सुरुवात झाली आहे. चवदार व आणि निसर्गतः थंड असलेल्या या ताडगोळ्यामुळे शरीरातील उष्णता नियंत्रित राहण्यास मदत होते. त्यात मोठ्या प्रमाणावर पोषकतत्व आणि पाणी असून ताडगोळ्यांच्या सेवनामुळे रोग प्रतिकार शक्ती म जबूत होण्यास मदत होते. खनिज, लोह, पोटॅशिअम, फॉस्फरस आणि व्हिटॅमिन ए, बी, सी हे जीवनसत्त्व ताडगोळ्यांमध्ये आढळतात. त्यामुळे थंडावा देणाऱ्या या फळांना उन्हाळ्यात मागणी वाढू लागली आहे. सध्या १०० रूपयांना सहा ते आठ ताडगोळ्यांची विक्री सुरू आहे.

अलिबागमधील नागरिकांना आणि पर्यटकांना मोहून टाकणारा रानमेवा म्हणजे ताडगोळे आहे. कोकण किनारपट्टीवर नारळी पोफळी प्रमाणेच ताडाची झाडेही मोठ्या प्रमाणावर आहेत. रायगड जिल्ह्यातील अलिबाग चौल, रेवदंडा, किहीम परीसरात ही झाडे पहायला मिळतात.

या फळातील गर पाणीदार आणि चवदार असतो. नैसर्गिक साधनसंपत्तीने नटलेल्या रायगड जिल्ह्यात पावसाळ्याप्रमाणे वसंत ऋतूमध्येही मोठ्या प्रमाणावर रानमेवा उपलब्ध असतो. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात या ताडगोळ्यापासून अनेक शेतकऱ्यांना चांगले उत्पन्नही मिळत आहे. ताडगोळ्याचे अनेक फायदे असल्याने पर्यटक आणि नागरिकही याकडे आकर्षित होत आहेत. उष्णता वाढल्यामुळे ताडगोळ्यांना मागणी वाढली आहे. ताडगोळे खरेदीसाठी बाजारात ग्राहकांची गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

## ग्रामपंचायत कार्यालय सुरू

| म्हसळा | प्रतिनिधी |

खारगाव खुर्द सकलप ग्रामपंचायत कार्यालय लाचखोरी प्रकरणानंतर कुलूपबंद झाल्यामुळे ठप्प झालेल्या जनसेवेविरोधात ग्रामस्थांनी उग्र भूमिका घेत मोर्चा काढून प्रशासनाला दिलेल्या इशाऱ्याचा तात्काळ परिणाम दिसून आला. निवेदन सादर केल्यानंतर अवघ्या काही अवधीतच ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप उघडून ते पुन्हा जनतेसाठी कार्यान्वित करण्यात आले. दि.५ मार्च रोजी अँटी करप्शन ब्युरो रायगड यांनी लाच घेतल्याप्रकरणी ग्राम अधिकारी व प्रशासक यांच्यावर कारवाई केल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय बंद करण्यात आले होते. परिणामी २५ दिवस दाखले मिळणे, घरपट्टी भरणा, पाणीपुरवठा योजना दुरुस्ती यांसारखी अत्यावश्यक कामे पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

# आंबेवाडी गावातील डोंगराला वणवा

## जीवसृष्टी लोप पावण्याच्या मार्गावर

| कोलाड | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील आंबेवाडी गावातील डोंगराला मंगळवारी (दि.३१) सायंकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास वणवा लावण्यात आला. या वणव्यामुळे संपूर्ण डोंगर होरपळून निघाला आहे. त्यामुळे हळूहळू येथील जीवसृष्टी नष्ट होत असुन त्यामध्ये असंख्य पशुपक्षी होरपळून निघत आहेत. परिस्थिती अशीच कायम राहिली तर जिवसृष्टी पुर्णतहः लोप पावेल. त्यामुळे याला जबाबदार कोण, अशी संतप्त प्रतिक्रिया निसर्गप्रेमींकडून व्यक्त होत आहे.



रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस वणवे लावण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे. वणवे लावणाऱ्यांवर कोणाचाही अंकुश नसल्याने व कायद्याचा धोका नसल्याने त्यांचे फावत आहे. शिकार करणे, वृक्षतोड करणे वनसंपदा मिळवणे, तसेच सरपणासाठी लागणारा लाकूड फाटा या करिता हे वणवे लावले जात आहेत. त्यामुळे वनसंपदेची हानी होत आहे. परंतु, याकडे वनखाते दुर्लक्ष करीत असल्याचे बोलले जात आहे. माणसाने स्वतःच्या स्वार्थासाठी अनादिकालापासून वृक्षाची अक्षरशः कत्तलच चालविली आहे. सद्याच्या आधुनिकेतेच्या व तंत्रज्ञानाच्या युगात औद्योगिकरण व नागरिकरणाच्या नावाखाली जंगलच्या जंगले भुईसपात होतांना दिसत आहे. त्यामुळे अगोदरच पर्यावरणाचे संतुलन पार बिघडले आहे. त्यामध्ये भर म्हणून ठिकठिकाणी लावण्यात आलेल्या वणव्यामुळे अधिकच भर पडत आहे. तर, वनसंपदेबरोबर प्राण्यांच्या वास्तव्यावर गदा देखील येतांना दिसत आहे.

# महामार्गावर वृक्ष लागवडीची मागणी

| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील किल्ले रायगडाकडे जाणारा महामार्ग हा ऐतिहासिक व पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. दरवर्षी हजारो पर्यटक, शिवप्रेमी आणि नागरिक या मार्गाचा वापर करून किल्ले रायगडाला भेट देतात. मात्र, या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वृक्षांची कमतरता जाणवत असून याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.



याही वर्षी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर प्रचंड उष्णता जाणवत आहे. झाडांची संख्या कमी असल्याने प्रवाशांना सावली मिळत नाही. तसेच, पर्यावरणीय समतोल राखण्यासाठीही वृक्ष लागवड अत्यावश्यक आहे. याआधी या मार्गावर संपूर्णपणे दोन्ही बाजूला मोठमोठे वृक्ष होते; परंतु, राष्ट्रीय महामार्गाने ही सर्व जुनी झाडे कापून अक्षय कन्स्ट्रक्शनला हा नवीन महामार्ग बनवण्यासाठी मार्ग मोकळा करून दिला होता. मात्र, जी झाड तोडण्यात आली होती, त्याच्या मोबदल्यात नवीन झाडे लावण्याचे काम अक्षय कन्स्ट्रक्शन व राष्ट्रीय महामार्ग विभागाने व्यवस्थितपणे केल्याचे दिसत नाही. तरी या रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केल्यास व त्यांना व्यवस्थित पाणी देऊन त्यांची निगा राखल्यास केवळ सावलीच नव्हे तर प्रदूषण कमी होण्यास, हवा शुद्ध राहण्यास आणि परिसरातील तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत होईल. त्यासाठी स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था आणि शिवप्रेमी मंडळांकडूनही वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घेण्याची मागणी होत आहे. शासनाच्या वन विभागाने तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागाने या महामार्गावर नियोजनबद्ध पद्धतीने वृक्ष लागवड करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# ‘माझं गाव, आरोग्य संपन्न गाव’ अभियान

## उपचारांपेक्षा आजार होऊच नयेत यावर विशेष भर

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

ग्रामीण भागातील आरोग्य सेवा मजबूत करण्याबरोबरच स्वयंपुर्ण ठेवण्यासाठी आरोग्य विभागाने पुढाकार घेतला आहे. रायगड जिल्ह्यात बुधवार दि.१ एप्रिलपासून ‘माझं गाव, आरोग्य संपन्न गाव हे अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत बुधवारी विशेष आरोग्य ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले असून ३१ मार्च २०२७ पर्यंत हे अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अखत्यारित ५५ आरोग्य केंद्रांसह २८८ उपकेंद्र आहेत. जिल्हा परिषदेचे दवाखानेदेखील आहेत. परंतु, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे गावे, वाड्यांपर्यंत आरोग्य सेवा पोहचत नसल्याच्या तक्रारी कायमच आहे. त्यामुळे तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी उपचारासाठी नागरिकांना जावे लागते. ही समस्या कायमची सोडविण्यासाठी आरोग्य विभागाने पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्यमा उंचावणे, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देणे, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी ‘माझं गाव, आरोग्य संपन्न गाव’ अभियान सुरु करण्यात आले आहे.



सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दीष्ट आहे. या अभियानांतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊच नयेत याबाबतच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव योजनेच्या प्रभावी अंम लबजावणीसाठी सर्व ग्रामपंचायतींना जिल्हा परिषद प्रशासनाकडून सूचना दिल्या आहेत.

आरोग्य विभागाच्या निर्दे शानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना आरोग्य संपन्न गाव म्हणून घोषित करण्यात येईल. या गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## आरोपींना पकडण्यासाठी पोलीसांची दमछाक

**पेण** : बोरगाव येथील सेलिब्रेशन रिसॉर्टवरील कुंटणखाना प्रकरणी दि.२३ मार्च रोजी चार जणांना अटक करण्यात आली होती. या दरम्यान चौकशी अंती नवीन चार आरोपींची नावे समोर आली आहेत. त्यामध्ये गणेश अण्णा, सुनिल कुमार मेहता, गणेश सुरेश गायकर आणि एक नाव पोलीसांनी गुपीत ठेवले आहे. तेव्हा पासून पोलीस या चार आरोपींना पकडण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करत आहेत. मात्र, पोलीसांच्या प्रयत्नांना यश येत नाही. त्यामुळे नाक्यानाक्यावर उलट सुलट चर्चांना उधान आले आहे. पोलीसांवर राजकीय दबाव टाकण्यात येत असल्याची चर्चा देखील जोर धरत आहे. पोलीसांच्या चौकशीवर सत्ताधारी पक्ष सोडून राजकीय मंडळींकडून संशय व्यक्त केला जात आहे.

# सिग्नल यंत्रणेच्या केबलला आग

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ-माथेरान मिनीट्रेन मार्गावर गाडीच्या टेलिफोन आणि सिग्नल यंत्रणेसाठी केबल टाकण्यात आली आहे. दरम्यान, मिनीट्रेन माथेरानकडे जात असताना या मार्गावरील सिग्नल यंत्रणेची केबल जळत असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी मिनीट्रेनमधून प्रवास करणारे तिकीट तपासनीस विजय लांडगे यांच्या हि बाब लक्षात येताच त्यांनी ती आग विझविण्याचे प्रयत्न केले.




ब्रिटिश काळात सुरू झालेल्या २१ किलोमीटर लांबीच्या मिनीट्रेन मार्गावर असलेल्या स्थानकांना जोडण्यासाठी सिग्नल तसेच टेलिफोन यंत्रणेची केबल या टाकण्यात आली आहे. दरम्यान, दि.२७ मार्च रोजी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास मिनीट्रेन माथेरानकडे प्रवाशांना घेऊन जात असताना कड्यावरचा गणपतीच्या पुढे पोहचली असता, टीसी विजय लांडगे यांना नॅरोगेज ट्रॅकच्या बाजूला दगडामध्ये असलेली केबल जळताना दिसली. त्यांनी त्वरीत मिनीट्रेन चालकाला गाडी थांबवण्याची सूचना केली. त्यानंतर विजय लांडगे यांनी क्षणाचीही विलंब न लावता ही बाब रेल्वे कर्मचारी यांच्या लक्षात आणून दिली आणि ही आग विझवण्याचा प्रयत्न केला. काही वेळात ही आग आटोक्यात आणण्यात त्यांना यश आले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. अन्यथा पुर्ण डोंगर जळून बेचिराख होऊन निसर्गाची मोठी हानी झाली असती.

# बागमंडला जेट्टीची दुरवस्था

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या बागमंडला-बाणकोट फेरीबोट सेवेतील बागमंडला जेट्टीची सध्या दुरवस्था झाली आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दुर्लक्षामुळे येथील प्रवाशांना, विशेषतः महिलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे.



सावित्री खाडीच्या पात्रातून सुरू असलेली ही फेरीबोट सेवा पर्यटन आणि व्यवसायासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, २०१५ मध्ये मेरीटाईम बोर्डाकडून येथे प्रवाशांसाठी बांधण्यात आलेल्या प्रसाधनगृहाची अवस्था सध्या कचरा डेपोसारखी झाली आहे. निसर्ग चक्रीवादळात नुकसान झाल्यानंतर या प्रसाधनगृहाची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. स्वच्छतागृहात सगळीकडे प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने पर्यटक आणि स्थानिक प्रवास करतात. परंतु, जेट्टीवर साधी स्वच्छतेची सोय नसल्यामुळे महिलांची मोठी अडचण होत आहे. पर्यटनासाठी येणाऱ्या महिलांना या दुरवस्थेमुळे मनस्ताप सहन करावा लागत असून, प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. प्रवाशांकडून आकारण्यात येणाऱ्या तिकीट दरातून १० टक्के निधी पोर्ट लेव्ही म्हणून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला दिला जातो. एवढा मोठा निधी जमा होत असतानाही प्रवाशांना किमान मूलभूत सोयी-सुविधा पुरवण्यात बोर्ड अपयशी ठरल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे.

# महिलांच्या उद्योजकतेला नवे बळ

| माणगाव | प्रतिनिधी |

औद्योगिक प्रगतीसोबतच सामाजिक बांधिलकी जपत पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत माणगाव विभागातील स्थानिक महिला उद्योजक व शेतकरी उत्पादकांसाठी कुणबी भवन हॉल येथे प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



या प्रदर्शनामध्ये एकूण ३५ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या स्टॉल्समध्ये घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ तसेच विविध स्थानिक उत्पादनांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. सुमारे ८० हून अधिक सहभागींचा या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग लाभला.

या कार्यक्रमाला जी युन पार्क, महेंद्र तट्टे, विशाल शेंडे, तसेच सीएसआर टीम यांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांचे कौतुक करत त्यांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन दिले. या प्रदर्शनामुळे ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या कौशल्यांना बाजारपेठ उपलब्ध झाली असून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ मिळाले आहे. तसेच, उत्पादनांमध्ये विविधता, गुणवत्ता सुधारणा आणि विपणन कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

हे प्रदर्शन केवळ विक्रीपुरते मर्यादित न राहता महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे आणि उद्योजकतेची नवी दिशा देणारे ठरले. सहभागी महिला व स्थानिक नागरिकांकडून या उपक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला.

पान १ वरून

## २३८ पदे रिक्त

कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. एका तलाठ्याकडे दोन ते तीन सजांचा कारभार सोपविला जात आहे. त्यामुळे असंख्य गावे वाड्यांमधील कामकाज पाहताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तलाठ्यांसह मंडळ अधिकारी यांना देखील गाव पातळीवरील महसूली कामे करताना अडचणी निर्माण होत आहेत. एकाच अधिकारी व कर्मचाऱ्यावर अनेक गावांतील कामकाजाची जबाबदारी असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची धावाधाव होत आहे. शासनाने दिलेल्या योजनांचे नियोजन करून ते घराघरात पोहचविणे कठीण होते. त्याचा भार अनेकवेळा कोतवालावर सोपविला जातो. दाखले देण्यासाठी माहिती लिहून देण्याचे काम कोतवाल करतात. महसूल विभागातील या रिक्त पदांमुळे ग्रामीण विकासावर परिणाम होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

## श्रद्धा बोऱ्हाडे यांना पोलीस कोठडी

सर्व प्रथम ३ लाख मागितले होते. तद्नंतर तडजोड होऊन २ लाख ५० हजार रुपये देण्याचे ठरवण्यात आले. याबाबत तक्रारदार यांनी अलिबाग येथील लाचलुचपत अधिकारी यांच्याकडे तक्रार नोंदवली होती. या तक्रारीची शहनिशा केल्यानंतर लाचलुचपत अधिकाऱ्यांनी सापळा रचला आणि मुरुड येथील सार्वजनिक बांधकाम कार्यालयात तक्रारदार यांच्याकडून लाच स्वीकारताना श्रद्धा बोऱ्हाडे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी अलिबाग-रायगड लाचलुचपत विभागाकडून अधिक तपास सुरू आहे.

## श्रीवर्धनमध्ये ‘राजकीय भूकंप’?

की, १२ एप्रिलनंतर श्रीवर्धनमध्ये राष्ट्रवादीचा अस्तित्वासाठी संघर्ष सुरू होईल. राजकीय विश्लेषकांच्या मते, जर ही घडामोड अपेक्षेप्रमाणे घडली, तर हा फक्त तालुक्यापुरता मर्यादित राहणार नाही, तर संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या राजकारणाला हादरा देईल.

## आरडीसीसी बँकेची सातत्यपूर्ण कामगिरी

कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी सांगितले की, तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि वेगवान सेवा या त्रिसूत्रीवर आधारित कामकाजामुळे बँकेने सातत्याने प्रगती साधली आहे. वाढत्या ठेवी व कर्जवाटपामुळे बँकेचा आर्थिक पाया अधिक भक्कम झाला आहे. डिजिटल बँकिंग, कृषी वित्त आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रावर लक्ष केंद्रित करत बँकेचा व्यवसाय मार्च २०२८ पर्यंत १०,००० कोटींवर नेण्याबाबत खात्री त्यांनी व्यक्त केली.

आर्थिक कामगिरीबरोबरच बँकेने सेवा विस्तार आणि ग्राहककेंद्री उपक्रमांवरही तितकाच भर दिला आहे. डिजिटल माध्यमातून नव्या ग्राहकांना जोडण्याबरोबरच विद्यमान ग्राहकांसाठी अधिक आकर्षक व्याजदर व नाविन्यपूर्ण ठेव योजना राबविण्यात येत आहेत. पगारदार खातेदारांसाठी नुकताच ५० लाख रुपयांचा अपघाती विमा संरक्षणाचा निर्णय घेत बँकेने सामाजिक सुरक्षेच्या दिशेनेही पाऊल टाकले आहे. चालू आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या नोकरभरतीमुळे शाखास्तरावरील मनुष्यबळ अधिक सक्षम झाले असून, ग्राहकांना अधिक वेगवान व गतिमान सेवा देणे शक्य झाले आहे. शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतही बँकेने पुढाकार घेतला असून, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्जवाटप, ‘लाडकी बहीण’ योजनेत महिलांना मिळालेले आर्थिक सहकार्य तसेच ‘पीएम किसान’ योजनेद्वारे शेतकऱ्यांना थेट लाभ पोहोचविण्यात बँक महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या सर्व उपक्रमांमुळे बँकेची केवळ आर्थिकच नव्हे, तर सामाजिक बांधिलकीही अधोरेखित होत आहे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी बँकेच्या या प्रगतीमध्ये सहकारी पतसंस्थानी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे आभार व्यक्त करताना आगामी काळात डिजिटल विस्तार, ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक समावेशन आणि उद्योग-शेती क्षेत्राला अधिक बळकटी तसेच ज्येष्ठ नागरिकांना सायबर सेक्युरिटी बाबत मार्गदर्शन मेळावे या दृष्टीने बँक वाटचाल करणार असून, ग्राहकांचा विश्वास आणि संचालक मंडळाची दूरदृष्टी यामुळे ही प्रगतीची घोडदौड पुढेही कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला.

## ‘एलिफंटा’वर सापडले १५०० वर्षांपूर्वीचे जलाशय

पुरातत्व सर्वेक्षण विभागाची एक टीम, पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. अभिजीत आंबेकर यांच्या नेतृत्वाखाली एलिफंटा बेटावर मागील ४ महिन्यांपासून बेटाच्या पूर्व बाजूला असलेल्या मोराबंदर परिसरात काम करत आहेत. या कामाचा उद्देश या परिसराचा कालानुक्रम निश्चित करणे. तसेच, येथील प्राचीन मानवी वसाहतींचे स्वरूप आणि व्याप्ती जाणून घेणे हा आहे. या उत्खननात शोध पथकाला एक आयताकृती जलाशय (टाके) आढळून आले आहे. या जलाशयाला उत्तरेकडे पायऱ्यांचा एक लंबवत भाग जोडलेला आहे. या रचनेमुळे बेटावरील प्राचीन जलव्यवस्थापन पद्धतीवर प्रकाश पडतो. तज्ज्ञांच्या मते, ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण शोधाची नोंद आहे. कारण बेटावर प्रसिद्ध असलेल्या इतर अनेक वास्तूंप्रमाणे हे जलाशय खडकात कोरून तयार केलेले नाही; उलट, बेटावरील रहिवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे आणि पावसाळ्यातील पाण्याचे योग्य व्यवस्थापन करता यावे, या उद्देशाने याची विशेष अभियांत्रिकी रचना करण्यात आली आहे.

या स्थळावरील महत्त्वपूर्ण शोधांपैकी एक म्हणजे एक भव्य वास्तू. त्याची लांबी सुमारे १४.७ मीटर असून, रुंदी ६.७ मीटर आणि १०.८ मीटर इतकी आहे; त्यामुळे या वास्तूला ‘टी’ आकाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. उत्खननाचे काम आतापर्यंत ५ मीटर खोलीपर्यंत पोहोचले असून, त्यात २० पायऱ्या उजेडात आल्या आहेत. या पायऱ्या दगडांच्या ठोकळ्यांपासून बांधण्यात आल्या आहेत; विशेष म्हणजे, हे दगड एलिफंटा बेटावरील स्थानिक दगड नाहीत, असे पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. अभिजीत आंबेकर यांनी सांगतात.

## जिल्ह्यात आज हनुमान जन्मोत्सवाचा जल्लोष

साजरा करण्यात आला. या उत्सवानंतर आता जिल्ह्यामध्ये श्री हनुमान उत्सवाचे वेध आहेत. त्यानिमित्ताने ग्रामीण व शहरी भागातील ग्रामस्थ मंडळांनी तयारी जोमाने केली आहे. जिल्ह्यात श्री हनुमानांची ६०६ मंदिरे आहेत. त्यातील काही मंदिरे ऐतिहासिक आहेत. जिल्ह्यामध्ये गुरूवारी श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त एकूण ३०८ ठिकाणी मिरवणुका काढण्यात येणार आहेत. २७ ठिकाणी सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पडणार आहेत. विधीवत पुजेनंतर आरती झाल्यानंतर सकाळपासून भाविकांसाठी मंदिरे खुली होणार आहेत. तसेच, गावागावांत संध्याकाळपर्यंत भजनांचा कार्यक्रम असणार आहे. रात्री आठ वाजल्यानंतर मिरवणूक काढण्यात येणार आहेत. या मिरवणुकींसोबत भजन, खालूबाजा, बेंजो आदी वाद्यांचा जल्लोष पहावयास मिळणार आहे. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हयामध्ये ८४२ पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असणार आहे. त्यामध्ये ८३ पोलीस अधिकारी, ६८९ पोलीस अंमलदार, ७० वाहतूक पोलीस कर्मचारी यांचा समावेश आहे. तसेच ३ आरसीपी दल, १ अतिशिघ्र कृती दल, ५ स्ट्रायकींग फोर्स ही सुरक्षा यंत्रणा तैनात असणार आहे.

## माथेरान घाटरस्त्यात मिनीबसमध्ये बिघाड

घाटरस्त्यात गियर बॉक्स खराब झाला. मिनीबसच्या चालकाने प्रसंगावधान राखल्याने ४५ प्रवाशांचे प्राण वाचले.कर्जत एसटी आगारातून कर्जत-माथेरान अशी मिनीबस बुधवारी सकाळी सव्वाआठ वाजता नेहमीप्रमाणे निघाली. सकाळची वेळ असल्याने या ३० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता असलेल्या मिनीबसमध्ये तब्बल ४५ प्रवासी प्रवास करीत होते. माथेरान घाट रस्त्याने ही मिनीबस प्रवाशांना घेऊन पुढे जात असताना जुन्मापट्टी येथील चढाव पार केल्यावर गाडीचे गियर पडले जात नसल्याचे चालक नितीन जाधव यांच्या लक्षात आले. त्यांनी प्रसंगावधान राखत चढाव पूर्ण केल्यावर मिनीबस काही अंतर पुढे घेऊन गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली. त्यावेळी चालकाने प्रवाशांनी तात्काळ उतरावे, अशी सूचना केल्यावर सर्व प्रवासी घाबरून खाली उतरले. घटनेचे गांभीर्य ओळखून बस थांबली आणि पुढील मोठा अपघात टळला. त्यामुळे अनेक प्रवाशांचा जीव वाचल्याने त्यांनी चालकाचे आभार मानले. परंतु, या सर्व गोष्टींमुळे प्रवाशांना आपल्या लहान मुलांसह माथेरानचा घाट चढून माथेरान गाठावे लागल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

## श्रीवर्धनमध्ये बिबट्याचा हैदोस

हल्ला करून तिला गंभीर जखमी केले. गायीच्या ओरडण्यामुळे घरातील लोक आणि आजूबाजूचे ग्रामस्थ तात्काळ धावून आले. नागरिकांनी आरडाओरडा केल्यामुळे बिबट्याने तेथून पळ काढला; मात्र, या हल्ल्यात गायीच्या तोंडावर गंभीर जखमा झाल्या आहेत. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला असला, तरी पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न पून्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वडघरसह करिवणे, जावेळे, वडशेत वावे, धारवली कोलमांडले आणि मधला वडघर या गावांमध्ये बिबट्याचा वावर नित्याचा झाला आहे. वारंवार तक्रारी करूनही वन विभाग आणि स्थानिक प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. आज गायीवर हल्ला झाला, उद्या एखाद्या माणसाचा बळी गेला तर त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

## कोकण विभागीय आयुक्तपदी अग्रवाल

व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्या कार्यरत होत्या. रुबल अग्रवाल या धडाकेबाज कार्यशैलीसाठी ओळखल्या जातात. त्या २००८ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत. सोलापूर येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या सेवेला सुरुवात केली. त्यानंतर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व अहमदनगर तसेच जळगाव येथे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी कामकाज पाहिले आहे. शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या पहिल्या महिला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी सक्षमपणे जबाबदारी सांभाळली आहे. पुणे महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत असताना त्यांनी कोविड-२०१९ च्या भीषण संकटाचे व्यवस्थापन अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या या कामगिरीची दखल राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली होती. यापूर्वी त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त म्हणून राज्यातील १ लाख १० हजार अंगणवाड्यांचे जाळे सक्षमपणे हाताळले आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर काम करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. रुबल अग्रवाल यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल त्यांनाउत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार, महात्मा गांधी शांतता पुरस्कार, अरुण बोंगीरवार सार्वजनिक सेवा उत्कृष्टता पुरस्कार, स्मार्ट सिटी डिजिटल पेमेंट आणि ई-गव्हर्नन्स पुरस्कार अशा अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

# निवडक

## पादचाऱ्याला इकोची धडक

**पनवेल :** केवाळे बस स्टॉप जवळ काळ्या पिवळ्या रंगाच्या इको टॅक्सीने पादचाऱ्याला धडक दिली. या धडकेत मोहन मुरमुर हा जखमी झाला. या प्रकरणी चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहन मुरमुर हा पायी चालत जात असताना हरीग्राम ते केवाळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील केवाळे बस स्टॉपजवळ काळया पिवळ्या रंगाच्या इको टॅक्सीने संध्याकाळी साडेसातच्या सुमारास त्याला ठोकर मारून अपघात केला. त्यात त्याच्या पाठीवर आणि डोक्याला गंभीर दुखापती झाल्या. त्याला सुकापुर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## अनोखा तिळगुळ समारंभ संपन्न



**माथेरान :** रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान येथे गेली १२ वर्ष तिळगुळ समारंभ फक्त सर्व जाती-धर्मातील विधवा स्त्रियांसाठी साजरा करत आहेत. या कार्यक्रमात विविध खेळ आणि लकी ड्रॉ याच्या माध्यमातून या स्त्रियांना आनंद देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. माथेरानमध्ये प्रथमताच किन्नर समाज अस्मिता फाऊंडेशन गुरूवर्य नीता केने यांच्या वाढदिवसानिमित्त सिमरन सिंह, आरती विश्वकर्मा, रज्जो केने यांनी माथेरान येथील विधवा महिलांना साड्यांचे वाटप करून आदर सत्कार करत अनोखा उपक्रम राबविला असून विधवा महिलांना आनंददायी जीवन जगण्यासाठी प्रवृत्त केले. याप्रसंगी महिलांकरता विविध खेळांचे आयोजन करीत पाच लकी ड्रॉ काढण्यात आले. प्रत्येक विजेत्याला प्रेशर कुकर वाटप करण्यात आले असून या कार्यक्रमांमध्ये गौरी कवठणकर यांनी आपल्या सुरेल आवाजात कार्यक्रमास येणाऱ्या महिलांचे मनोरंजन केले.वर्षा शिंदे, स्नेहल लोटणकर, मैत्री ग्रुपच्या रेखा चौधरी, अर्चना बिरामणे, सोनम दाभेकर, प्राची कदम, वनिता दिघे, तनवी दाभेकर, मनीषा शिंदे, गीता खाडे, रचना सावंत, हेमा सावंत, सुहासिनी दाभेकर, सुषमा जाधव, ज्योती सोनावणे, मंदा तुपे, विदुला खेडकर, कामिनी शिंदे, अर्चना कदम या महिला उपस्थित होत्या. माथेरानच्या सपोनि. सरिता मुसळे या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होत्या.

## विरोधकांचे हंडा-कळशी आंदोलन



**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत आज पाणीटंचाईच्या प्रश्नावर विरोधी पक्षाने जोरदार आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. नगरसेवकांनी हंडा, कळशी व घागर घेऊन सभागृहात प्रवेश करत अनोख्या पद्धतीने आपला निषेध नोंदवला. पालिका क्षेत्रात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल होत असून, अनेक भागात नियमित पाणीपुरवठा होत नसल्याचा आरोप विरोधकांनी केला. नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात सत्ताधारी अपयशी ठरले आहेत, अशी टीका यावेळी करण्यात आली. या गंभीर समस्येवर ठोस उपाययोजना करण्यात प्रशासन व सत्ताधारी अपयशी ठरत असल्याने सर्वच नगरसेवक हतबल झाल्याचे चित्र महासभेत दिसून आले. काही वेळ सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.दरम्यान, प्रशासनाने लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने पावले उचलली जातील, असेही सांगण्यात आले.

## शिक्षक संजय बिरादार यांचा गौरव




**कापोली :** महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना दिला जाणारा प्रतिष्ठेचा महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५-२०२६ यावर्षी संजय दत्तात्रय बिरादार रायगड जिल्हा परिषद शाळा आदगाव यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्याचा राज्यस्तरावर सन्मान झाल्याने सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुणे येथील निगडी परिसरातील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात एज्युकेशन आयकॉन्स समिट- २०२६ या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रपती पुरस्कार विजेते दत्तात्रय वारे यांच्या हस्ते संजय बिरादार यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचा सन्मान करण्यात आला. राज्यातील ३६ जिल्ह्यांमधून निवडक शिक्षकांची काटेकोर प्रक्रियेनंतर निवड करण्यात आली होती.

## 'वाशी' सुंदर गाव स्पर्धेत प्रथम




**पेण :** वाशी ग्रामपंचायतीने आणखी एक मानाचा तुरा मिळवला आहे. आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार यंदा या ग्रामपंचायतीला जाहीर झाला असून त्यासोबत १० लाख रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. गावातील स्वच्छता, सुशोभिकरण, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग या निकषांवर ग्रामपंचायतीने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. गावात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर स्वच्छ, हरित आणि आकर्षक बनला आहे. या पुरस्कारामुळे गावाच्या विकासकामांना आणखी चालना मिळणार असून, ग्रामपंचायत प्रशासन तसेच ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### भाजपच्या निलंबनाच्या कारवाईनंतर

# मनोहर म्हात्रेंनी सोडले मौन

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीत भाजपने बहुमत मिळविले. परंतु, प्रभाग १४ मध्ये दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता. प्रभाग क्रमांक १४ हा भाजपसाठी पूर्वी मजबूत मानला जाणारा भाग होता. २०१७ च्या निवडणुकीत या प्रभागातून भाजपला तीन जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे यावेळीही विजय निश्चित मानला जात होता. मात्र निकाल लागल्यानंतर चारही उमेदवार कमी फरकाने पराभूत झाल्याने पक्ष नेतृत्वाने या निकालाकडे केवळ पराभव म्हणून न पाहता, त्यामागील अंतर्गत कारणांचा शोध घेण्यास सुरुवात केली. स्थानिक पातळीवर प्रचार झाला असला, तरी अपेक्षित एकजूट दिसली नाही, काही भागात अधिकृत उमेदवारांना संघटनात्मक पाठबळ कमी पडले, तर काही ठिकाणी विरोधकांना अप्रत्यक्ष मदत झाल्याचे प्राथमिक अहवालातून समोर आले.

या निवडणुकीत भाजपने प्रभाग १४ मध्ये नव्या चेहऱ्यांवर मोठा विश्वास दाखवला होता. सतीश दत्तात्रेय पाटील, इकबाल हुसेन काझी, रेणुका मयुरेश नेतकर या तिन्ही नव्या उमेदवारांना संधी देण्यात आली. याशिवाय नव्याने भाजपमध्ये आलेल्या सारिका अतुल भगत यांनाही पक्षाने उमेदवारी दिली. परंतु, त्या तिघांनाही पराभव स्वीकारावा लागला होता.

निवडणुकीनंतर सर्वाधिक गंभीर आरोप मनोहर म्हात्रे आणि मुकित काझी या दोन माजी नगरसेवकांवर झाले. स्थानिक उमेदवारांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करताना आरोप केला की, या दोघांनी अधिकृत उमेदवारांसाठी अपेक्षित काम केले नाही. काही भागात विरोधी उमेदवारांच्या संपर्कात राहून अप्रत्यक्ष मदत केल्याचेही सांगण्यात आले. या तक्रारीनंतर जिल्हा भाजपने अंतर्गत पडताळणी सुरू केली. मतदान केंद्रनिहाय आकडे, पदाधिकाऱ्यांचे अहवाल आणि उमेदवारांची निवेदने तपासण्यात आली. त्यानंतर दोघांनाही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी दोघांनाही सहा वर्षांसाठी निलंबित केले.

प्रभाग १४ मधून निवडणूक लढवलेल्या भाजप उमेदवारांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. पक्षासाठी प्रामाणिकपणे का करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय मिळाली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### निष्ठावानांना हीच शिक्षा?

पक्षासाठी आयुष्य घातलं, जनतेसाठी रात्रंदिवस झटलो आणि आज माझ्यावरच अन्याय? अशा शब्दांत माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांनी आपल्या मनातील वेदना व्यक्त करत पक्षाच्या कारवाईवर भावनिक प्रतिक्रिया दिली आहे. निलंबनानंतर अखेर त्यांनी मौन तोडत आपल्या जिव्हाळ्याच्या कार्यकर्त्यांसमोर आणि जनतेसमोर मन मोकळं केलं.

म्हात्रे म्हणाले, ही कारवाई केवळ अन्यायकारक नाही, तर माझ्या निष्ठेचा अपमान आहे. कोणताही ठोस पुरावा नसताना, केवळ ऐकीव माहितीवर आणि राजकीय आकसातून आपल्यावर निर्णय घेतल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणुकीच्या काळातील अनुपस्थितीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, ३ जानेवारीला मोठ्या बहिणीचं निधन झालं. घरात दुःखाचा डोंगर कोसळला होता. १३ जानेवारीपर्यंत सर्व विधींसाठी नाशिकला राहावं लागलं. त्या काळातही पक्षाचा विचार करत होतो. पण माझ्या दुःखाची कुणालाही किंमत वाटली नाही. सलग तीन वेळा निवडून येऊनही उमेदवारी नाकारली गेली. तरीही आपण पक्षाशी प्रामाणिक राहिलो, आदेशांचे पालन केले. कधीच पक्षविरोधात गेलो नाही मग माझी चूक नेमकी काय? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

प्रभाग १४ मधील पराभवाबाबत बोलताना त्यांनी काही अंतर्गत घडामोडींवरही प्रकाश टाकला. निष्ठावान कार्यकर्त्यांना दूर सारलं गेलं, बाहेरच्या लोकांना पुढे आणलं. त्यामुळेच मतदार नाराज झाला, असे त्यांनी सांगितले. आपल्या कामाचा वापर प्रचारासाठी करण्यात आला, मात्र स्वतःला जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आल्याची वेदना व्यक्त करताना ते म्हणाले, माझं काम वापरलं, पण माझं अस्तित्वच पुसलं ही वेदना शब्दांत सांगता येणार नाही. दरम्यान, त्यांच्या समर्थनार्थ प्रभाग १४ आणि नेरे परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनाम्यांची तयारी सुरू केली असून, तीव्र नाराजी आहे. ज्यांनी खरंच पक्षाशी गद्दारी केली, त्यांच्यावर कारवाई नाही आणि आमच्यासारख्या निष्ठावान लोकांना शिक्षा, अशी भावना कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

## अवजड वाहतुकीने नागरिक त्रस्त

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा बाजारपेठेतील नित्याच्या वाहतूक कोंडीने ग्रामस्थ त्रस्त झाले असून अजवड वाहतुक ही रेवदंडा बायपासमार्गे वळवावी अशी मागणी ग्रामस्थ व प्रवासीवर्ग करत आहेत. रेवदंडा बाजारपेठतील रस्ता अरूंद असल्याने दोन अवजड वाहने पास होत असताना, वाहन चालकांना जिकरीचे असते. शिवाय मुरूड पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आल्याने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतुकीत वाढ झाली आहे. रेवदंडा बाजारपेठेत मुरूड व अलिबागकडे ये-जा करणाऱ्या लहान मोठ्या वाहनांची संख्या वाढली असून मिनिटागणीत वाहतुक येथून सुरू असते. रेवदंडा बाजारपेठेतील रस्ता अरूंद आणि वळणाचा असल्याने नित्याने वाहतुक कोंडी होते. या वाहतुक कोंडीने वेळेचा अपव्यय निर्माण होतो. बाजारपेठेत रस्ता रूंदीकरण करणे गरजेचे आहे, मात्र रेवदंडा बायपास रस्ता सुरळीत असल्याने चौलनाका येथून तसेच रेवदंडा मोठे बंदर येथून अवजड वाहने या मार्गी वळवावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

## घरफोडी करणारे गुन्हेगार ताब्यात

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहर परिसरात घरफोडी करणाऱ्या ५ जणांच्या टोळीपैकी तिघा जणांना गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने ताब्यात घेतले असून त्यांच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

पनवेल शहर परिसरात घरफोडी झाल्याच्या घटनांच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे राहते घराच्या सामानाचे खोलीची खिडकी उचकटून त्या वाटे घरामध्ये प्रवेश करून घरातील लाकडी कपाटाचे दरवाजे उचकटून व लाकडी बेडमध्ये ठेवलेले ४०,००,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी करून नेल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घरफोडींचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष ३ चे वपोनि अविनाश काळदाते यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, पो.हवा.दिपक डोंगरे, सागर रसाळ, अजिनाथ फुंदे, लवकुश शिंगाडे, प्रसाद घरत आदींच्या पथकाने सदर आरोपींचा शोध सुरू केला असता सदर गुन्ह्याच्या केलेल्या तपासात घटनास्थळ च्या आजूबाजूचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता नमूद गुन्ह्यात एकूण पाच आरोपींचा सहभाग असल्याचे दिसून आले. सदर गुन्ह्याचे तांत्रिक तपासात गुन्ह्यातील तीन आरोपींना भाईंदर परिसरातून ताब्यात घेऊन त्यामध्ये ललित शाही (३३), किशोर शाही (२९), शेर शाही (३५) यांना ताब्यात घेतले असता त्यांनी त्यांचे सहकारी पाहिजे आरोपी भरत यादव व विष्णु शाही यांचे सह केले असल्याचे कबूल केले. त्यानुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

## दोन घरांमध्ये घरफोडी

**पनवेल :** दोन बंद घरांमध्ये घरफोडी करत चोरांनी चांदीच्या, पितळेच्या वस्तू आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अर्जुन मोहिते (राहणार सेक्टर १५ ए, नवीन पनवेल) यांच्या रूमच्या दरवाजाचे लॉक तोडून चोराने चांदीच्या समई, घंटी, पैंजण, जोडवी, कंगन, सोन्याचे बदाम, रोख रक्कम आणि देवाच्या पितळेच्या मूर्ती चोरून नेल्या तर त्यांच्याच सोसायटीमधील पहिल्या माळ्यावरील रूम नंबर तीन मधील अक्षया व्यंकटेश्वरा यांच्या घरातून देखील चांदीचे दिवे, समई, वाट्या, ग्लास आणि रोख रक्कम व देवीच्या मूर्ती चोरून नेल्या.

## महापालिकेची ६९१कोटींची वसुली

**| पनवेल | प्रतिनिधी |**




पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ६९१कोटी कोटींची वसुली केली असून हा आजवरील सर्वाधिक वसुलीचा विक्रम आहे.आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने गेले वर्षभर नियोजनबध्द पध्दतीने रूपरेषा आखून वसूलीचा हा विक्रम केला आहे. मालमत्ताकर विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नियंत्रणाखाली योग्य उपाययोजना राबवत महसूल तिजोरीत जमा झाला आहे.

मागील वर्षी सप्टेंबर महिन्यांपर्यंत ९०टक्के शास्ती मध्ये सूट त्यानंतर शास्ती मध्ये ७५ टक्के सूट मालमत्ता करांमध्ये देण्यात आली होती. या सर्वाचे फलित म्हणजे या आर्थिक वर्षात आतापर्यंत चा सर्वाधिक म्हणजे एकुण ६९१ कोटी इतका महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. मालमत्ता विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे व कर अधिक्षक महेश गायकवाड व सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली चारही प्रभागामंध्ये गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यापर्यंत तसेच गेला मार्च महिना संपेपर्यंत कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी कोणतीही सुट्टी न घेता शनिवार, रविवारीदेखील कार्यालये सुरू ठेवली. पालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी मालमत्ता करधारकांडून पालिकेने वसुलीची थेट कारवाई सुरु केली. या वसुलीसाठी महापालिकेच्यावतीने यावेळी १३ पथके तयार केली होती. प्रभाग अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके सर्व प्रभागांमध्ये वसुलीसाठी जात होती.

विकास कामे करण्यासाठी महापालिकेकडे मालमत्ता कर हे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असल्याने वेळोवेळी सावध पाऊले उचलली. या आर्थिक वर्षात एकूण १७५३ थकबाकीदारांना जप्ती नोटीसा देण्यात आल्या तर या अटकावणी मोहिमेत १७० मालमत्तांवर अटकावणीची कारवाई करण्यात आली.

वेळोवेळी मालमत्ताधारकांच्या आक्षेप व हरकतीनूसार त्यांच्या बिलात सुधारणा करुन दिली जात आहे. याचबरोबर यापुढेही मालमत्ताधारकांना त्यांच्या बिलाबाबत कोणत्याही हरकती किंवा सूचना असल्यास त्यानूसार त्यांच्या बिलात सुधारणा करण्याची भुमिका महापालिकेने घेतली आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या सूचना किंवा आक्षेप असल्यास तो नोंदवावा आणि आपला मालमत्ता कर भरून पनवेलच्या विकासास हातभार लावावा असे आवाहन केले आहे.

## पनवेलकरांच्या पाणीटंचाईवर टँकरची मात्रा

**| पनवेल | प्रतिनिधी |**



खारघर, कामोठे आणि तळोजा या उपनगरांमध्ये तीव्र झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेने सर्व प्रभागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. महापौर नितीन पाटील यांच्या पाहणी दौऱ्यादरम्यान अनेक रहिवाशांनी पाणी प्रश्न भेडसावण्याच्या समस्येकडे लक्ष्य वेधले.

त्यानंतर महापौरांनी महापालिका प्रशासनाला तातडीच्या सूचना देत पिण्याच्या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्यासाठी आपत्कालीन आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. खारघर, कामोठे आणि तळोजा परिसरातील नागरिकांना सध्या पिण्याच्या पाण्याची मोठी कमतरता भासत आहे. महापौरांच्या दौऱ्यादरम्यान नागरिकांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

या मागण्यांची दखल घेत महापौरांनी स्पष्ट केले की, सिडको महामंडळाकडून पाणीपुरवठा सेवा हस्तांतरण झाले नसले तरी नागरिकांना पाणी देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. त्यामुळे ज्या प्रभागांमध्ये पाणीटंचाई आहे, तेथे तात्काळ पाहणी करून संबंधित गृहनिर्माण संस्थांना टँकरने पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश देण्यात आले.

> पनवेल महापालिकेतील पाणी समस्या मुळापासून दूर करण्यासाठी आमचे प्रयत्न जोरदारपणे सुरू आहेत. त्याचे तात्काळ परिणाम दिसत नसले तरी दीर्घकालीन पाणी दिलासा नक्कीच मिळेल. प्रत्येक वसाहतीमध्ये पाणी समस्या निर्माण झाल्यास त्या तक्रारींचे तातडीने निवारण करावे आणि गरज भासल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, यासाठी स्वतंत्र पाणी पथक स्थापन करून कार्यवाही करण्याची सूचना महापालिका आयुक्तांना दिल्या आहेत.- नितीन पाटील, महापौर, पनवेल महापालिका

या दरम्यान नागरिकांचे पाणी हाल टाळण्यासाठी महापौरांच्या सूचनेनंतर १ एप्रिलपासून प्रत्येक प्रभागात दोन टँकर राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, पाणीपुरवठा विभागात अतिरिक्त मनुष्यबळ नेमून स्वतंत्र पथक तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र मोबाइल क्रमांक देऊन (न बदलणारे) तक्रारींचे नोंद व तत्काळ निराकरण केले जाईल. सुरुवातीला दिवसा सेवा सुरू करून नागरिकांच्या प्रतिसादानुसार ती २४ तास सुरू ठेवण्याचा विचार असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.

## अध्यक्षपदी पवन कदम यांची निवड

**रसायनी :** अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघ महाराष्ट्र राज्य(रजि.) या कोयना प्रकल्पग्रस्त संघटनेच्या अध्यक्षपदी पवन राजारामराव कदम यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघ यांची त्रैवार्षिक सभा नुकतीच कोयना वसाहत अध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मागील कार्यकारिणी यांची मुदत संपल्याने सन २०२८/२०२९ पर्यंत साठी नवीन कार्यकारिणी यांची निवड करण्यात आली. अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघ गेली अनेक वर्षे कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या हितासाठी, त्यांच्या पर्यायी जमिनीसाठी, कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या नागरी सुविधा, कोयना प्रकल्पग्रस्त दाखले यासाठी सातत्याने शासकीय दरबारी काम करीत असून वेळ प्रसंगी आंदोलन, उपोषण देखील करण्यात आले आहे. पवन राजारामराव कदम यांनी यापूर्वी रायगड जिल्हा अध्यक्षपद, संघटनेचे सल्लागार म्हणून देखील काम केले असून ते माजी सरपंच आहेत.

## शिवभोजन केंद्राचे आठ महिन्याचे अनुदान रखडले

■ **केंद्रचालकावर उपासमारी**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलमधील शिवभोजन केंद्रा चालवणाऱ्या केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचे जवळपास आठ महिन्यांचे अनुदान रखडले आहे. पनवेल पुरवठा विभागाकडून बिल पाठवण्यास होत असलेल्या उशिरामुळे अनुदानाला विलंब झाला असल्याचे समोर आले आहे.



पनवेलच्या शहरी भागात १० आणि ग्रामीण भागात नऊ अशी शिवभोजनची १९ केंद्र आहेत. दररोज २ हजार ३५० मंजूर थाळी असून रोज अंदाजे २ हजार २०० पेक्षा जास्त थाळीचे वाटप केले जाते. सद्यस्थिती १० रुपयांमध्ये शिवभोजन थाळी मिळत असून पनवेल परिसरातील हजारो गोरगरीब, नागरिक या थाळीचा लाभ घेत आहेत.

या दहा रुपयांमध्ये चपाती, भाजी, भात, वरण मिळते. मात्र आठ महिन्यांपासून शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नसल्याने पनवेल मधील केंद्र चालकांना हे केंद्र चालवताना तारेवरची कसरत करावी लागते. जुलै २५ ते फेब्रुवारी २६ या ८ महिन्याची केंद्र चालकांनी आपापली बिले दिली. मात्र पुरवठा विभागाकडून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे बिले वेळेवर पाठवण्यात आले नसल्याने त्याचा फटका केंद्र चालकांना बसत आहे. एक-दोन महिन्यात अनुदान मिळेल या आशेवर आठ महिने गेले तरी देखील अनुदान मिळालेले नाही. पुरवठा विभागाच्या निष्क्रियतेमुळे अनुदान थकले असल्याचा आरोप केंद्र चालकांनी केला आहे.

याबाबत पुरवठा अधिकारी, पनवेल यांना विचारले असता केंद्र चालक वेळेवर बिले आणत नाहीत. सात ते आठ जण वेळेवर आणतात आणि जानेवारीपर्यंतची बिले पुढे पाठवली असल्याचे सांगितले.

**२६० हून अधिक एसटी सीएनजीवर | महामंडळाचे प्रवासी आणि पर्यटक त्रस्त**

# एसटी आगारात गॅस भरण्यासाठी होतोय विलंब

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

डिझेलच्या जागी आता सीएनजीवर चालणाऱ्या एसटी बसेस रस्त्यावर धावत आहे. मात्र सीएनजी गॅस भरण्यासाठी अलिबाग स्थानकात विलंब होत असल्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. प्रशासनाच्या नियोजनाअभावी प्रवाशांना स्थानकात एसटीची ताटकळत वाट पहावी लागत आहे.

यापुर्वी राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेस डिझेलवर चालत होत्या. परंतु गेल्या दोन वर्षापासून जिल्ह्यातील एसटी बसेस सीएनजीवर चालविण्यावर भर देण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात ४३० हून अधिक एसटी बसेस आहेत. यापैकी २६० हून अधिक एसटी बसेस सीएनजीवर चालणाऱ्या आहेत. जिल्हयातील अलिबागसह पेण, महाड या बस आगारात सीएनजी पंपाची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्ह्यात सीएनजीवर चालणाऱ्या एसटी बसवर भर देण्यात आला आहे. अलिबाग, पेण, महाड या एसटी बस आगारात सीएनजी गॅस पंप उभारण्यात आले आहे.



जिल्हयात सीएनजीवर चालणाऱ्या सुमारे २६० एसटी बसेस आहेत. डिझेलची जागा आता सीएनजीने घेतली आहे. मात्र गॅस भरण्यासाठी विलंब होत असल्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. मुरूड आगारातील एसटी बसेस अलिबाग एसटी बस आगारात सीएनजी गॅस भरण्यासाठी येतात. त्यामुळे बसमधील प्रवाशांना गॅस भरण्यासाठी पुन्हा बसमधून उतरावे लागते. गॅस भरण्यासाठी अर्धा तासाहून अधिक कालावधीत होत असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. सध्या तापमानात वाढ होऊ लागली आहे. उन्हाचे चटके बसत आहेत. बसची वाट पाहण्यासाठी उभ्या असलेल्या प्रवाशांना उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची भिती आहे. त्याकडे मात्र एसटी महामंडळाचे दूर्लक्ष असल्याचे समोर आले आहे. प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न यातून निर्माण होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

## आकादेवी मातेचा पालखी सोहळा

**नागोठणे :** शेतपळस येथील जागृत देवस्थान व भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री आकादेवी मातेचा चैत्र पालखी सोहळा व यात्रौत्सव शुक्रवारी (दि. ३) पारंपारिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात साजरा होणार असून या धार्मिक सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आल्याची माहिती श्री आकादेवी माता मंदिर देवस्थान समितीचे अध्यक्ष वामन डाकी व पालखी उत्सव समितीचे अध्यक्ष मिलिंद डाकी यांनी दिली. श्री आकादेवी मातेच्या या चैत्र पालखी सोहळ्या निमित्ताने शेतपळस गावाच्या हद्दितील मुंबई-गोवा महामार्गलगत असलेल्या मातेच्या मंदिर परिसरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही यात्रा भरणार आहे.

# राष्ट्रवादी सैरभैर

काँग्रेसला शह देण्यासाठी शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. नंतर भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ते काँग्रेससोबत गेले व त्यातूनच इंडिया आघाडी स्थापन झाली. त्यावेळी राष्ट्रवादी हा महाराष्ट्रातला नव्या नेत्यांचा ताकदवान पक्ष वाटत होता. पण पाहता पाहता हे तेज लोपले आहे. प्रकृतीच्या कारणास्तव शरद पवार आता फार सक्रीय नाहीत. त्यांच्या गटाला विधानसभेत फटका बसल्यापासून त्यामध्ये अस्वस्थता आहे. दुसरीकडे अजित पवार यांच्या निधनामुळे राष्ट्रवादीच्या सत्तेसोबत असलेल्या गटाची ताकदही एकाएकी कमी झाली आहे. नव्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी अजून तरी खऱ्या अर्थाने नेतृत्वाची चमक दाखवलेली नाही. उपमुख्यमंत्रिपद घेतले असले तरी प्रशासनात दबदबा निर्माण करायला त्यांना बराच कालावधी लागेल. नुकतीच मुंबई महापालिकेच्या आयुक्तांची निवड झाली. या निवडीमध्ये एकनाथ शिंदे यांनी काही नावांवरून अडवून धरले होते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना त्यांच्याशी दीर्घ चर्चा करावी लागली. अगदी अश्विनी भिडे याही शेवटी शिंदे यांच्या भेटीला गेल्या असे म्हणतात. पण या प्रक्रियेत सुनेत्रा पवार कुठेच नव्हत्या असे चित्र होते. राष्ट्रवादीला मुळात मुंबईत नगण्य स्थान आहे हे खरे आहे. पण मुंबईसारख्या पालिकेच्या आयुक्तपदाचा निर्णय होत असताना सत्तेतल्या तीनही पक्षांचा समान विचार घेऊनच निर्णय व्हायला हवा. अजितदादा असते तर तो तसा झालाच असता. आता सुनेत्राताईंना गृहित धरले जाते आहे. त्यांना याबाबत काही म्हणायचे आहे असेही दिसत नाही. नुकत्याच झालेल्या अधिवेशनातही सुनेत्रा यांची भूमिका मौन राखून सर्व पाहण्याचीच राहिली. प्रशासनातील खाचाखोचा समजून घेण्यासाठी ते आवश्यक असेलही. पण पक्षामध्ये तरी किमान त्या आपला अधिकार वापरू शकतात. पण तिथेही त्यांना अनेक जण गृहित धरून परस्पर कारभार करत आहेत की काय असे चित्र आहे. दोनचार वरिष्ठ म्हणवले जाणारे नेते पक्ष सुनेत्राताईंच्या मौनाचा आणि सध्याच्या स्थितीचा फायदा घेऊन हव्या त्या कारवाया करीत आहेत की काय अशी शंका निर्माण झाली आहे.

## रायगडात काय घडले

याचे एक उदाहरण रायगड जिल्ह्यात नुकतेच दिसले. इथल्या पक्षाच्या एका कार्यक्रमासाठी जे बॅनर्स लागले होते त्यावर पक्षाच्या केवळ रायगड जिल्ह्यातल्या एकाच कुटुंबातल्या लोकांची नावे व फोटो होते. जणू हे लोक म्हणजेच पक्षाचे सर्वेसर्वा आणि कर्तेधर्ते असे भासवण्याचा हा प्रयत्न होता. सुनेत्राताई वगैरे जाऊच द्या, पण ज्यांच्या नावाने हे गळे काढतात व डोळ्यात पाणी आणतात त्या अजितदादांचा फोटोही त्यावर नव्हता असे म्हणतात. अजितदादा जाऊन जेमतेम एक महिना झाला आहे. तोवरच त्यांच्या आठवणी आणि वारसा पुसण्याची ही घाई बोलकी म्हणावी लागेल. याबाबत नंतर राज्याच्या मंत्र्यांनी खुलासा केला व स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांनी बोर्ड लावल्याने असला प्रकार घडला अशी सारवासारव केली. यातले खरेखोटे या पक्षातले लोकच जाणोत. पण मूळ प्रश्न असा की, अजितदादा हयात असताना असा प्रकार करण्याची हिंमत त्या तथाकथित स्थानिक मंडळीनी झाली असती काय? याचे उत्तर अर्थातच स्वच्छपणे नाही असे आहे. उलट आम्ही अजितदादांच्या किती जवळ आहोत हे दाखवण्यासाठी प्रयत्न झाले असते व होतच होते. आता अजितदादा गेल्यानंतर हा पक्ष ताब्यात घेण्याचा प्रयत्न तीनचार नेतेमंडळी करीत आहेत. तसा आरोप रोहित पवार यांनीही केला आहे. हे जे नेते आहेत त्यांना हा पक्ष लवकरात लवकर भाजपच्या गोठ्यात नेऊन उभा करायचा असावा असाही काहींचा संशय आहे. पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवण्यापेक्षा भाजपमध्ये सामील झालो किंवा त्यांचे पूर्ण आश्रित म्हणूनच स्वतःला घोषित केले की, आपल्या भानगडींना तहहयात संरक्षण मिळेल असे त्यांच्यापैकी काहींना वाटत असावे. इडीची वगैरे भीती नको आणि रात्री सुखाने झोप येईल असा त्यांचा विचार असावा. पण त्यांचे हे इरादे राष्ट्रवादीच्या गावागावातल्या सच्च्या कार्यकर्त्यांना मंजूर होणारे नाहीत. अजितदादांनी सत्तेसाठी भाजपसोबत युती केली. त्यावर आम्ही या स्तंभातून अनेकदा कठोर टीका केली आहे. पण अजितदादांनी अशी युती केल्यानंतरही राष्ट्रवादीचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्याची धडपड केली हे मान्य करावेच लागेल. फुले-शाहू-आंबेडकरांचा वारसा जपला पाहिजे अशी त्यांची मनापासून भावना होती असे दिसते. शिवाय नबाब मलिक यांच्यासारख्यांची पाठराखण करून त्यांनी सेक्यूलर तत्वांबाबतची बांधिलकीही प्रकट केली होती. त्यासाठी किंमत मोजायची तयारीही ठेवली होती.

## दादांच्या अपघाताबाबतच्या शंका

राष्ट्रवादी ताब्यात घेऊन स्वतःच्या स्वार्थासाठी भलत्याच दिशेने नेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना अशी कोणतीही किंमत भरण्याची इच्छा नाही. स्वतःची कातडी वाचवणे, आपल्या भानगडी बाहेर येऊ नयेत हे पाहणे इतकेच या लोकांचे मर्यादित उद्दिष्ट असावे. पण महाराष्ट्रभर पसरलेले राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सजग आहेत. ते या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून असतील. आधी शरद पवारांच्या आणि नंतर अजितदादांच्या कृपेमुळे मोठे झालेल्या नेत्यांना ते पूर्ण पक्ष बळकावू देतील असे वाटत नाही. अर्थात, यासाठी आता सुनेत्राताईंना अधिक ठामपणे व जाहीरपणे काही भूमिका घ्याव्या लागतील. अजित पवार यांच्या अपघातासंदर्भात अनेक शंका आहेत. रोहित पवार गेले काही दिवस याबाबत कितीतरी प्रश्न विचारत आहेत. अजितदादांच्या गटातले सामान्य कार्यकर्तेही त्यावरून अस्वस्थ आहेत. अमोल मिटकरी यांच्यासारखे काही तरुण नेते रोहित पवारांच्या शंकांना पाठिंबा देत आहेत. पण दादांचा पक्ष ताब्यात घेऊ पाहणाऱ्या काही नेते मंडळींना मात्र हे सर्व पसंत नाही. ते रोहित पवार यांच्यावरच उलट आरोप करीत आहेत. रोहित यांनी आपल्या आरोपांबाबत राज्यात पोलिस फिर्याद दाखल करण्याचा प्रयत्न केला. पण ती होऊ दिली गेली नाही. रोहित यांनी राज्य विधिमंडळ अधिवेशनात यावर स्वतंत्र चर्चेची मागणी केली. पण ती मान्य झाली नाही. मुख्यमंत्र्यांनी परस्पर सीबीआय चौकशीची मागणी केली. पण ते आधी जाहीर केले नाही. नंतर वृत्तपत्रात याच्या सोईस्कर बातम्या छापल्या गेल्या. असल्या तपासाबाबत सीबीआयचे पूर्वीचे रेकॉर्ड खराब आहे. त्यामुळे त्याने चौकशी केली तरीही तिच्यातून काय निष्पन्न होईल हा प्रश्न आहेच. मुळात मुद्दा असा आहे की, रोहित अजितदादांचे विमान आणि विमान कंपनी यांच्याबाबत जे आक्षेप घेत आहेत ते गंभीरपणे घेऊन त्यांची चौकशी करण्याची तयारी आहे की नाही. सरकारला ही चौकशी करायची नाही हे दिसते आहे. पण अजितदादांचे फोटो व नाव वापरणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांना त्याची आच का वाटू नये हे कोडे आहे. यामुळेच दिसते आहे त्याहून अधिक या प्रकरणात दडले आहे की काय अशा नसत्या शंका निर्माण होतात. असो. पण राष्ट्रवादीतील सुनेत्राताईंचा अधिकार तोंडदेखला मान्य केला जात आहे. तो करावा लागतो आहे. पण आतून काही मंडळी या अधिकाराला बारीक बारीक सुरुंग लावत आहेत की काय असा प्रश्न उपस्थित झाल्याखेरीज राहत नाही. राष्ट्रवादीसारखा एक महत्वाचा पक्ष काही मूठभर नेत्यांमुळे असा सैरभैर होणे हे राज्याच्या राजकारणासाठी चांगले नाही.

---

**विचार**

# इराणमधील सत्ता उलथवण्यात अपयश का?

***अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध उभारलेला लष्करी संघर्ष एका भू-राजकीय वर्चस्वाच्या मोठ्या संघर्षाचा भाग आहे; परंतु इराणची सत्ताव्यवस्था एका नेत्यावर नव्हे, तर अनेक संस्थांवर, वैचारिक आधारावर उभी आहे. यामुळेच बाह्य दबाव असूनही ती टिकून राहिली. भविष्यात यात बदल होईल किंवा होणार नाही; मात्र मध्यपूर्वेतील राजकारणात इराण पुढील अनेक वर्षे निर्णायक ठरणार आहे.***



**प्रा. जयसिंग यादव**

मध्यपूर्वेतील राजकारणात गेल्या काही दशकांपासून सर्वात संवेदनशील आणि संघर्षपूर्ण समीकरण म्हणजे अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव. विशेषतः इराणी इस्लामिक क्रांती झाल्यानंतर इराणमध्ये इस्लामिक रिपब्लिकची स्थापना झाली आणि त्यानंतर अमेरिका-इराण संबंध कायमच संघर्षमय राहिले. अलीकडच्या काळात अमेरिका आणि इस्रायलने इराणमधील सत्तांतर घडवून आणण्यासाठी थेट किंवा अप्रत्यक्ष प्रयत्न केल्याचे संकेत दिसून येतात. लष्करी कारवाया, आर्थिक निर्बंध, सायबर हल्ले आणि राजकीय दबाव अशा अनेक माध्यमांमधून इराणला कमकुवत करण्याचा प्रयत्न झाला, तथापि या सर्व प्रयत्नांनंतरही इराणची सत्ताव्यवस्था कोसळली नाही. उलटपक्षी, ती अधिक कणखरपणे टिकून राहिल्याचे दिसते. यामागे केवळ लष्करी ताकद नाही, तर इराणच्या राजकीय रचनेची वैशिष्ट्ये, वैचारिक आधार आणि संस्थात्मक संरचना यांचा मोठा वाटा आहे. इराणविरुद्ध अमेरिकेची भूमिका गेल्या चार दशकांमध्ये सतत कठोर राहिली आहे. विशेषतः अणुकार्यक्रमाच्या प्रश्नावरून आणि मध्यपूर्वेत इराणच्या वाढत्या प्रभावामुळे अमेरिका आणि इस्रायल दोघेही चिंतेत राहिले. त्यामुळे आर्थिक निर्बंध, गुप्त कारवाया, विरोधी गटांना समर्थन यांचा वापर करून इराणची सत्ता कमकुवत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. काही वेळा लष्करी कारवायांचाही अवलंब करण्यात आला. इराणच्या संरक्षणव्यवस्थेला धक्का देण्यासाठी हवाई हल्ले, लष्करी तळांवर लक्ष्यित कारवाया किंवा अणुसंशोधनाशी संबंधित केंद्रांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न झाले. या सर्व कारवायांचा मुख्य उद्देश एकच-इराणमधील विद्यमान राजवट अस्थिर करणे आणि अखेरीस सत्तांतर घडवून आणणे. प्रत्यक्षात मात्र या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. असे का घडत आहे?

इराणची सत्ताव्यवस्था एखाद्या व्यक्तीभोवती केंद्रीत नसून अनेक संस्थांवर आधारित आहे. त्यामुळे एखादा नेता किंवा पदाधिकारी गमावला, तरी संपूर्ण व्यवस्था ढासळत नाही. सर्वोच्च नेत्याबरोबरच अनेक धार्मिक, राजकीय आणि लष्करी संस्था सत्तेचा भाग आहेत. इराणमधील सर्वात प्रभावशाली संस्था म्हणजे 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' (आयआरजीसी). हे दल केवळ लष्करी शक्ती नसून राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातही मोठा प्रभाव राखते. क्षेपणास्त्र कार्यक्रम, ड्रोन तंत्रज्ञान आणि अनेक रणनीतिक क्षेत्रांवर या दलाचे नियंत्रण आहे. महत्त्वाचे म्हणजे, ही संस्था वैचारिकदृष्ट्या इस्लामिक क्रांतीशी बांधील आहे. त्यामुळे बाह्य दबावामुळे तिची निष्ठा सहज डळमळीत होत नाही. इराणमध्ये राजकीय व्यवस्था केवळ प्रशासनिक रचनेवर नाही, तर वैचारिक आधारावर उभी आहे. शिया धार्मिक परंपरा, क्रांतीचा वारसा आणि परकीय हस्तक्षेपाविरोधातील राष्ट्रवादी भावना यामुळे सत्तेला व्यापक वैचारिक आधार मिळतो. परकीय हस्तक्षेप वाढला, की अनेकदा ही राष्ट्रवादी भावना तीव्र होते आणि सत्तेला अधिक पाठिंबा मिळतो. इराणच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग राज्याशी संबंधित संस्थांच्या ताब्यात आहे. धर्मादाय ट्रस्ट, सरकारी उद्योग आणि लष्करी संस्थांचे व्यावसायिक नेटवर्क यामुळे सत्तेशी निष्ठावान वर्ग तयार झाला आहे. या आर्थिक संरचनेमुळे सत्ताधारी अभिजात वर्गाचे हितसंबंध विद्यमान व्यवस्थेशी घट्ट जोडले गेले आहेत. इराणमध्ये सरकारविरोधी असंतोष आहे; परंतु संघटित नसून सुधारणावादी, राजेशाही समर्थक, डावे गट अशा गटांमध्ये विभागलेला आहे. त्यामुळे सत्तेला प्रभावी आव्हान निर्माण होत नाही.

इराणची राजकीय व्यवस्था पारंपरिक हुकूमशाहीसारखी नाही. ती अनेक सत्ताकेंद्रांवर आधारित आहे. धार्मिक नेतृत्व, लष्कर, निवडून आलेले प्रतिनिधी आणि न्यायसंस्था या सर्वांचा सत्ताव्यवस्थेत सहभाग आहे. देशात निवडणुका होतात. राष्ट्रपती आणि संसद निवडली जाते; मात्र उमेदवारांची तपासणी आणि राजकीय प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थांमुळे ही लोकशाही मर्यादित स्वरूपाची राहते. याशिवाय, देशातील सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत मानली जाते. व्यापक पाळत ठेवण्याची व्यवस्था, इंटरनेट नियंत्रण आणि कठोर कायदे यामुळे मोठ्या प्रमाणावर बंडखोरी करणे कठीण होते. इतिहास सांगतो, की परकीय लष्करी हस्तक्षेप अनेकदा अपेक्षित परिणाम देत नाही. अफगाणिस्तान, इराक किंवा लिबिया यासारख्या उदाहरणांमध्ये हस्तक्षेपानंतर राजकीय अस्थिरता वाढल्याचे दिसून आले. यामुळे इराणमधील अनेक नागरिकही बाह्य हस्तक्षेपाबाबत सावध भूमिका घेतात. सरकारविरोधी असंतोष असला, तरी परकीय शक्तींच्या मदतीने सत्तांतर व्हावे अशी सर्वांची इच्छा नसते. इराणमध्ये सामाजिक आणि आर्थिक असंतोष वाढत असल्याचे अनेक निरीक्षक मानतात. तरुण पिढी अधिक जागतिक विचारांची आहे आणि ती राजकीय बदलांची मागणी करते. त्यामुळे भविष्यात बदलाची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. तथापि, सध्या तरी इराणची राजकीय व्यवस्था संस्थात्मकदृष्ट्या मजबूत आहे. त्यामुळे बाह्य दबाव किंवा मर्यादित लष्करी कारवायांमुळे तात्काळ सत्तांतर घडेल असे दिसत नाही.

इराणी इस्लामिक क्रांती घडून चार दशकांहून अधिक काळ उलटला असला, तरी इराण आज पुन्हा एका मोठ्या राजकीय आणि लष्करी संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. अलीकडे अमेरिका आणि इस्रायल यांनी केलेल्या संयुक्त हवाई हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि काही वरिष्ठ लष्करी कमांडर मारले गेल्याच्या बातम्यांनी मध्यपूर्वेतील राजकारण ढवळून निघाले आहे. या हल्ल्यांमध्ये इराणच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले. यानंतर अमेरिका आणि इस्रायलने इराणमध्ये सत्तापालट घडवून आणण्याचे संकेत दिले, इतकेच नव्हे, तर इराणी जनतेलाही विद्यमान सरकार उलथवून टाकण्याचे आवाहन करण्यात आले. केवळ बाह्य लष्करी हल्ल्यांमुळे इराणची सत्ताकठोर व्यवस्था सहज कोसळेल असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. कारण इस्लामिक क्रांतीनंतर या देशात अशी एक राजकीय रचना निर्माण झाली आहे, जी मोठ्या धक्क्यांनाही तोंड देण्यास सक्षम आहे. कडक नियंत्रित संस्था, वैचारिक प्रशिक्षण, सत्ताधारी वर्गातील ऐक्य आणि विखुरलेला विरोध या सर्व घटकांनी मिळून ही व्यवस्था टिकवून ठेवली आहे. खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र मोज्तबा खामेनी यांची सर्वोच्च नेते म्हणून निवड झाले. अनेक विश्लेषकांच्या मते ते आपल्या वडिलांची कठोर आणि पाश्चात्यविरोधी धोरणे पुढे चालू ठेवतील. त्यामुळे सत्तेमध्ये मूलभूत स्वरूपात बदल होण्याची शक्यता सध्या तरी कमी मानली जात आहे.

इराणकडे बहुधा हुकूमशाही व्यवस्था म्हणून पाहिले जाते; परंतु पारंपरिक अर्थाने ती एका व्यक्तीच्या हुकूमशाहीवर आधारित नाही. काही तज्ज्ञ या व्यवस्थेला 'पॉलिडिक्टेटरशिप' असे संबोधतात. म्हणजेच सत्ता एका व्यक्तीकडे केंद्रित नसून अनेक संस्थांमध्ये विभागली आहे. देशातील 'गार्डियन कौन्सिल' ही संस्था संसदेत मंजूर झालेल्या कायद्यांना नकार देऊ शकते आणि निवडणुकांसाठी उमेदवारांची तपासणी करण्याचे अधिकार तिच्याकडे आहेत. त्यामुळे राजकीय प्रक्रियेवर तिचे प्रचंड नियंत्रण आहे. इराणमध्ये राष्ट्रपती निवडणुकाही कडक नियंत्रणाखाली होत असल्यामुळे मर्यादित लोकशाहीचे प्रतीक मानल्या जातात. इराणच्या सत्ताकठोर व्यवस्थेचा कणा म्हणजे 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'. ही संघटना केवळ लष्करी दल नाही, तर राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातही प्रभावी शक्ती बनली आहे. देशाच्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन कार्यक्रमांवर तिचे नियंत्रण आहे. याशिवाय तिच्या प्रभावाखाली असलेले बासीजसारखे स्वयंसेवक निम लष्करी गट समाजात नियंत्रण राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या संघटनेचे वैशिष्ट्य म्हणजे तिची संस्थात्मक सातत्याची व्यवस्था. प्रत्येक वरिष्ठ कमांडरखाली अनेक स्तरांवर उत्तराधिकारी नियुक्त केलेले असतात. त्यामुळे एखादा नेता गमावला, तरी संघटनेची कार्यक्षमता अबाधित राहते. पाश्चात्य निर्बंधांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला असला, तरी या रचनेमुळे सत्ताधारी वर्ग सुरक्षित राहिला आहे. परिणामी, सत्ताव्यवस्थेविरोधात अंतर्गत बंड दिसले तरी फूट दिसून येत नाही.

इस्लामिक क्रांतीनंतर इराणमध्ये धार्मिक, राजकीय आणि शैक्षणिक संस्थांचे विस्तृत जाळे उभे राहिले. या संस्थांद्वारे राज्याची विचारसरणी पिढ्यान्‌पिढ्या पुढे पोहोचवली जाते. शिया धर्मातील 'शहादत' किंवा बलिदानाची परंपरादेखील राजकीय निष्ठेला बळकटी देणारी ठरली आहे. यामुळे सत्तेप्रती निष्ठा केवळ राजकीय नसून वैचारिक आणि धार्मिक स्वरूपाचीही बनते. अनेक विश्लेषकांच्या मते हीच व्यवस्था इराणला इतर अनेक मध्यपूर्व देशांपेक्षा वेगळे आणि टिकाऊ बनवते. इराणमध्ये अनेक सरकारविरोधी चळवळी उभ्या राहिल्या. २००९ मधील 'ग्रीन मूव्हमेंट' असो किंवा महसा अमिनी यांच्या मृत्यूनंतर २०२२ मध्ये उसळलेल्या आंदोलनांच्या लाटेने राजवटीविरोधातील असंतोष स्पष्ट केला, तरीही या चळवळींमध्ये एकत्रित नेतृत्वाचा अभाव राहिला आणि कठोर दडपशाहीमुळे त्यांना यश मिळाले नाही.

---

**चर्चा आजची**

# 'फळांचा राजा' संकटात



**संतोष राऊळ**

कोकणाला लाभलेले निसर्गाचे वरदान म्हणून हापूस आंब्याची ओळख आहे. हापूस आंबा त्याच्या उत्तम चवीसाठी व अप्रतिम गोडीसाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे त्याला 'फळांचा राजा' म्हटले जाते. तसेच, हापूस आंब्याला देश-विदेशात मोठी मागणी असल्याने या आंब्याच्या हंगामाकडे दरवर्षी उत्सुकतेने पाहिले जाते. रत्नागिरी आणि देवगडसह रायगड जिल्ह्यात देखील हापूस आंब्याचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेतले जाते. मात्र, यंदाच्या हंगामातील हवामानाच्या लपंडावामुळे हाच फळांचा राजा यंदा मोठ्या संकटात सापडला आहे.

हापूस आंब्याचा खरा हंगाम एप्रिल व मे महिन्यात असतो. मात्र, यंदाच्या हंगामात हवामानाने अक्षरशः लपंडाव खेळल्यामुळे हापूस आंबा संकटात आहे. यंदा पाऊस उशिरा थांबला आणि थंडी देखील उशिरा सुरू झाली. मध्येच तापमानात अचानक वाढ झाली. या चढ-उतारामुळे डिसेंबरमध्ये येणारा मोहोर उशिरा आला. जानेवारीत चांगली थंडी पडल्याने त्याचा चांगला परिणाम हापूस आंब्याच्या मोहोरवर दिसला. त्यानंतर अचानक तापमान वाढल्याने मोहर गळून पडला. त्यातच काही ठिकाणी अवकाळीचा फटका उरल्या सुरल्या मोहोरला बसत आहे. परिणामी, उत्पादनावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. हवामानाच्या लंपडावामुळे हापुस आंब्यावर तुडतुडे व भुरीसारख्या रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे.त्यामुळे त्यावर औषध फवारणीचा खर्च वाढला असून उत्पादन शून्य अशी स्थिती निर्माण झाली आहे.

यादरम्यान, शेतकऱ्यांनी व बागायतदारांनी फवारणीसाठी मोठा खर्च केला. त्यांनी एका फवारणीसाठी तब्बल हजारो रुपये खर्च करण्यात आल्याचे रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. अशा प्रकारे त्यांनी आपल्या आंबा फळ पिकावर तीन ते चार वेळा औषध फवारणी केली आहे. तरीही उत्पादनावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. फवारणी करूनही हातात काहीच आलं नाही, अशी शेतकऱ्यांची हतबल प्रतिक्रिया आहे. रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, मुरुड, म्हसळा, श्रीवर्धन, महाड व अलिबाग येथे बहुतांश भागात सुरुवातीला मोहोर दिसत असला तरी प्रत्यक्षात फळ धारणा अत्यल्प राहिली आहे. सध्या अनेक ठिकाणी केवळ ५ टक्केच आंबा शिल्लक आहे. जिल्ह्यात आंबा उत्पादनात तब्बल ९० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे चित्र असून, उर्वरित पिकावरही रोग व अवकाळी पावसाचे सावट कायम उभे ठाकले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बागायतदार शेतकरी पुरता संकटात सापडला आहे.

मोर्बा येथील ६५ वर्षीय बागायतदार शेतकऱ्याने आपली व्यथा मांडली आहे. त्यांनी १९९४ पासून कष्टाने उभी केलेली आंबा-काजू बाग यंदा पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. त्यांच्या ५ एकर जागेत सुमारे ३०० हापूस झाडे, तर ५ एकर जागेत ६०० काजू वेंगुर्ला वाण फळझाडे उभी आहेत. त्यांना दरवर्षी हापुस आंबा पीकातून ५ लाख रुपये, तर काजू पीकातून ४ ते ४.५ लाख रुपये उत्पन्न मिळते. परंतु, यंदा मात्र हवामानाच्या लंपडावामुळे संपूर्ण पीक हातातून गेले आहे.

रायगड जिल्ह्यात सुमारे १२००० हेक्टरवर आंबा लागवड आहे. या संपूर्ण क्षेत्रावर हवामान बदलाचा गंभीर परिणाम झाला आहे. आंबा आणि काजू ही कोकणातील प्रमुख नगदी पिके असल्याने हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात आला असून, निर्यात घटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संकटामुळे स्थानिक अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. शासनाने अद्याप ही बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आपली भूमिका स्पष्ट केली नाही. दरम्यान, आंबा व काजू नुकसान भरपाईसाठी विधानसभेत आवाज उठला गेला. प्रति शेतकरी सरसकट ५ लाख रुपये नुकसान भरपाईची रक्कम देण्याची मागणी झाली. त्यानंतर या प्रश्नाला उत्तर देताना फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊन लवकर निर्णय घेऊन शेतकऱ्यांना भरपाई कशी देता, येईल याबाबत उत्तर देऊन आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनाचे प्रत्यक्षात काय झाले? हा प्रश्न अद्यापही अनुत्तरीतच राहिला आहे.

ही सर्व परिस्थिती पाहता बागायतदार शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. पूर्वी रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार मानले जायचे. परंतु, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या संकटांकडे शासनाचा दुर्लक्ष होत राहिले. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी भातशेतीकडे पाठ फिरवली. आता तशीच भीती आंबा बागायतदारांबाबत वर्तविली जात आहे. त्यामुळे कोकणाची खरी ओळख असलेला 'फळांचा राजा' हापूस आंबा कायमचा संपुष्टात येईल, अशी भीती सध्या आंबा प्रेमींकडून वर्तविली जात आहे.

---

**लोकसंसद**

## चेंगराचेंगरीच्या वाढत्या घटना मन विषण्ण करणाऱ्या

बिहार राज्यातील नालंदा जिल्ह्यातील बिहार शरीफजवळ वसलेल्या मघरा गावातील प्रसिद्ध शीतला माता मंदिरात अष्टमीच्या निमित्ताने जमलेल्या भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरी होऊन ८ महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे मंदिराच्या परिसरात चेंगराचेंगरी होऊन भाविक मृत्युमुखी पडल्याच्या आणखी एका घटनेची इतिहासात नोंद झाली. कारण मंदिरांच्या ठिकाणी चेंगराचेंगरीच्या अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना यापूर्वी देशात अनेकवेळा घडल्या आहेत. त्यातील चेंगराचेंगरीच्या काही ठळक घटना म्हणजे, २००३ साली नाशिक येथील कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला. २००५ साली वाई जवळील मांढरदेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत २९१ भाविक मृत्यू पावले. २००८ साली नैनादेवी यात्रा (हिमाचल प्रदेश) चेंगराचेंगरीत १६२ जणांचा मृत्यू, २००८ साली चामुंडादेवी मंदिर (राजस्थान) २२४ जणांचा चेंगराचेंगरीत मृत्यू. गेल्या वर्षीच्या काही घटना म्हणजे, २ मे २०२५ रोजी गोव्यातील शिरगाव येथील लैराई देवीच्या यात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत सात भाविकांचा मृत्यू झाला. २९ जानेवारी २०२५ रोजी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ मेळ्यात चेंगराचेंगरी होऊन ३० जण प्राणास मुकले. तर २७ जून २०२५ रोजी ओडिशा राज्यातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रे दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत तीन भाविकांचा मृत्यू झाला. भाविकांची अति गर्दी, अफवा आणि चुकीच्या गर्दी नियोजनामुळे होणाऱ्या मंदिर परिसरातील चेंगराचेंगरीच्या वाढत्या घटना मन विषण्ण करणाऱ्या आहेत.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे**

---

**दिनविशेष**

# अंजनीपुत्र हनुमान की जय

मनोजवं मारुततुल्यवेगं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्। वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतम् शरणं प्रपद्ये।। शक्ती आणि बुद्धीचा सर्वोत्तम संगम असलेल्या हनुमानाची जयंती गुरुवार, २ एप्रिल २०२६ रोजी साजरी केली जात आहे. चैत्र शुद्ध पौर्णिमेला अंजनी मातेच्या पोटी हनुमानाचा जन्म झाला. त्यामुळे चैत्र शुद्ध पौर्णिमा हनुमान जयंती म्हणून साजरी केली जाते. हनुमानाला मारूती, बजरंगबली, रामभक्त, आंजनेय, महावीर, पवनपुत्र, पवनसुत, केसरीनंदन अशा अनेक नावाने संबोधले जाते. हनुमानाचे शस्त्र गदा हे आहे. हनुमंताला मारूती म्हणण्याची पद्धत केवळ महाराष्ट्रातच आढळून येते. हनुमानाला तेल, शेंदुर, रूईची फुले, पाने अर्पण करण्याची परंपरा आहे. हनुमानाला महादेव शिवशंकाराचा अवतार मानले जाते.

वनराज केसरी आणि अंजना यांनी भगवान शंकराची घोर तपश्चर्या केली होती. त्याच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन भगवान शिवाने त्यांना वरदान दिले की ते अंजनाच्या पोटी जन्म घेतील. या कारणास्तव हनुमानजींना भगवान शंकराचा ११वा रुद्र अवतार म्हटले जाते.

महावीर हनुमान हे प्रभू श्री रामाचे परम भक्त आहेत. हनुमानजींचा जन्म वानर जातीत झाला. त्यांच्या आईचे नाव अंजना (अंजनी) आणि वडील वानरराज केशरी. या कारणास्तव त्यांना अंजनय आणि केसरीनंदन इत्यादी नावांनी संबोधले जाते. दुसऱ्या मान्यतेनुसार, हनुमानजींच्या जन्मात पवन देव यांचीही भूमिका होती.

एकदा अयोध्येचे राजा दशरथ आपल्या पत्नींसोबत पुत्रष्टी हवन करत होते. पुत्रप्राप्तीसाठी हा हवन केला जात होता. हवन संपल्यानंतर गुरुदेवांनी तिन्ही राण्यांमध्ये अल्प प्रमाणात खीरचा प्रसाद वाटला. अंजनी माँ तपश्चर्या करत असलेल्या ठिकाणी एका कावळ्याने खीरचा एक भाग सोबत नेला. हे सर्व भगवान शिव आणि पवनदेवाच्या इच्छेनुसार घडत होते. तपश्चर्या करत असलेल्या अंजनाच्या हातात खीर आल्यावर तिने ती खीर भगवान शिवाचा प्रसाद मानून स्वीकारली. या प्रसादामुळे हनुमानाचा जन्म झाला. हनुमानाच्या जन्माची कथा: यांच्या आशीर्वादाने सोन्याचे बनलेले सुमेरूमध्ये केसरीचे राज्य होते त्यांची अंजना नावाची एक अतिशय सुंदर बायको होती. एकदा अंजनाने स्वच्छ आंघोळ केली आणि सुंदर कपडे आणि दागिने घातले. त्या वेळी पवनदेवाने तिच्या कर्णपटलात प्रवेश करताना तिला परत येताना असे आश्वासन दिले की तुला सूर्य, अग्नी आणि सोन्यासारखा तेजस्वी, वेदांमध्ये पारंगत, विश्ववंद्य महाबली असा पुत्र होईल आणि तसेच घडले.

कार्तिक कृष्ण चतुर्दशीच्या महानिषेला अंजनाच्या पोटी हनुमानजींचा जन्म झाला. दोन तासांनंतर सूर्य उगवताच त्याला भूक लागली. आई फळे आणायला गेली. येथे हनुमानजींनी लाल रंगाच्या सूर्याला फळ मानले आणि ते घेण्यासाठी आकाशात झेप घेतली. त्या दिवशी अमावास्येमुळे राहू सूर्याला गिळंकृत करण्यासाठी आला होता, पण हनुमानजींना दुसरा राहू समजून राहूने तिथून पळ काढला. तेव्हा इंद्राने हनुमानजींवर वज्राने जोरदार हल्ला केला. त्यामुळे त्यांची हनुवटी वाकडी झाली, त्यामुळे त्यांना हनुमान म्हटले गेले. इंद्राच्या या वाईट कृत्याला शिक्षा देण्यासाठी पवन देवतेने सर्व प्राणिमात्रांचे वायू परिसंचरण बंद केले. तेव्हा ब्रह्मदेवांसह सर्व देवांनी हनुमानाला वरदान दिले. ब्रह्माजी उत्तम आयू चे, इंद्राने वज्राने इजा न होण्याचे, सूर्याने सामर्थ्याने परिपूर्ण आणि सर्व शास्त्रांमध्ये जाणकार असण्याचे, वरुण ने पाश आणि पाण्यापासून निर्भय राहण्याचे, यमाने यमदंडाने अवध्येने पाश ने नाश न होण्याचा, कुबेरांनी शत्रुंमर्दिनी गदा पासून असे निर्भय राहण्याचे, शंकराने प्रमत्त आणि अजिंक्य योद्ध्यांना जिंकण्याचे, विश्वकर्माने मय पासून तयार केलेले दुर्बोध्य आणि असह्य,अस्त्र शस्त्र आणि यंत्रापासून कोणतीही इजा न होण्याचे वरदान दिले. अशा वरदानांच्या प्रभावामुळे, हनुमानजींनी केलेली अफाट शौर्याची सर्व कर्मे हनुमानजींच्या भक्तांमध्ये प्रसिद्ध आहेत आणि जी न ऐकलेली किंवा अज्ञात आहेत, ती रामायण, पद्म, स्कंद आणि वायू इत्यादी विविध प्रकारच्या पुराणांमधून ज्ञात होऊ शकते.

# शेतकऱ्यांविषयी गांभीर्य नाही

## शशिकांत शिंदे यांचा सरकारवर आरोप



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**अतिवृष्टी आणि अवकाळी पाऊस नुकसानीची भरपाई सरकारकडून अजूनही मिळाली नाही. केंद्राकडून इतर राज्यांना मदत झाली, मात्र आपल्या राज्याला मदत मिळाली नाही. राज्य सरकारला शेतकऱ्यांविषयी गांभीर्य नाही, हे आम्हाला सभागृहात दिलेल्या उत्तरातून समजले आहे. एकही मंत्री अवकाळी पाऊस जिथं झाला तिथं गेले नाहीत, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.**

शशिकांत शिंदे म्हणाले की, महायुतीमध्ये आलबेल आहे. आपल्या खुर्चीला स्थिर करण्यासाठी किंवा स्वतःला भक्कम दाखवण्यासाठी त्यांच्यात चढाओढ सुरू आहे. तसेच, प्रत्येक जण काही ना काही 'ऑपरेशन' करत आहे, मात्र 'ऑपरेशन तुतारी' होणार नाही, याची मी खात्री देतो, असेही ते बोलताना म्हणाले.

पुढे ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानाकडे सरकार गांभीर्याने पाहत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांपेक्षा निवडणुका कशा जिंकायच्या, याचे तंत्र त्यांना माहित पडल्यामुळे सामान्य लोकांकडे लक्ष देण्याची सरकारला गरज वाटत नसावी. सरकार सत्ताकरणात व्यस्त आहे. मुख्यमंत्री आसामच्या दौऱ्यावर गेले. परंतु, अद्याप एकही मंत्री अवकाळी पाऊस झालेल्या ठिकाणी भेट देण्यासाठी गेलेला नाही. हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे, असे शशिकांत शिंदे यांनी सांगितले.

सातार प्रकरणात एसीपीच्या सक्तीच्या रजेची चर्चा सुरु झाली आहे. एकनाथ शिंदे यांची फसवणूक झाली असे म्हणायचे का? या पत्रकाराच्या प्रश्नाला उत्तर देताना शशिकांत शिंदे म्हणाले की, मला सांगावसं वाटत की, ज्या अर्थी एसपींना रजेवर पाठवलं, याचा अर्थ तिथे चुकीच झालं हे अप्रत्यक्षपणे राज्य सरकारने कबलू केल्याचे दिसते. नाहीतर ते रजेवर गेले नसते. रजेवर पाठवलं म्हणजे यंत्रणेचा गैरवपार केला हे सिद्ध झालं, असेही शशिकांत शिंदे यांनी बोलताना स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, आमची मागणी ही आहे की, ते अर्जित रजेवर गेले असतील तर ते चुकीचे आहे. त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले पाहिजे.

सक्तीच्या रजेबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, या सर्व गोष्टींच्या बाबतीत चौकशीत कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप होऊ नये, म्हणून रजेवर पाठवलं आहे. आमची मागणी आहे की, चौकशी लवकरात लवकर करुन चुकीचं काही झालं असेल तर निवडणूक प्रक्रिया रद्द झाली पाहिजे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ एप्रिल
१)श्री.तुकाराम गौऱ्या लडगे मु.नवेदार, नवगाव, अलिबाग १-४-१९४६
२)श्री.बळीराम केशव पाटील अलिबाग दि.१-४-१९४५
३)श्री.प्रभाकर गोविंद पाटील मु.नवेदरबेली, अलिबाग दि.१-४-१९५६
४)श्री.नामदेव नारायण जाधव रामनाथ रोड, अलिबाग दि.१-४-१९५८

२ एप्रिल
१)श्रीम.कांचनमाला अशोक बागडे चेंढरे, अलिबाग २-४-१९४८

कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



निरज विद्याधर पैठणकर, थळ पेठ, अलिबाग

## आर.बी. पाटील यांचे निधन



**चिरनेर :** रामवाडी येथील आर.बी.पाटील यांचे वयाच्या ८०व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, चार भाऊ, सुना व नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषद माध्यमिक विभागामध्ये त्यांनी ऑफिस सुप्रिडेंट म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आदर्श विद्या मंदिराचे संस्थापक व सचिव म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी केली. त्यांच्या अंत्ययात्रेसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांचे दशक्रिया विधी ३ एप्रिल रोजी हरिहरेश्वर येथे, तर तेरावे ६ एप्रिल रोजी रामवाडी येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहेत.

## हनुमान जन्मोत्सव

**खांब :** रोहा तालुक्यातील बाहे गावामध्ये याही वर्षी दि.१ आणि २ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त दि.१ एप्रिल रोजी सायं.५ वाजता हरिपाठ, सायं. ७ ते ९ डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्री आळंदी यांची हरिकिर्तनरूपी सेवा तद्नंतर महाप्रसाद व रात्रीकाठी मिरवणूक सोहळा तर दि.२ एप्रिल रोजी सकाळी श्री हनुमान जन्मसोहळा व अभिषेक, सकाळी १० वा. महापूजा, दुपारी पालखी सोहळा व रात्री महाप्रसाद आदी कार्यक्रम साजरे करण्यात येणार आहेत.

## बाजारात कडधान्य खरेदीला प्रतिसाद

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल बाजारात विविध कडधान्यांचे मोठ्या प्रमाणात आगमन झाले असून नागरिकांकडून खरेदीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. बाजारात तूर डाळ, हरभरा डाळ, मूग डाळ, उडीद डाळ, मसूर डाळ, चवळी, राजमा, वाटाणा यांसारख्या कडधान्यांची उपलब्धता वाढली आहे. गृहिणींकडून या कडधान्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. तसेच, बाजारात दरही तुलनेने स्थिर असल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

# नावडेकरांचा पाणीप्रश्न गंभीर

## विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांची घेतली भेट



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नावडे वसाहतीमध्ये मागील आठ ते दहा दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यामुळे संतप्त झालेल्या रहिवाशांनी सकाळीच विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांच्या निवासस्थानी धाव घेत आपली व्यथा मांडली.

नागरिकांनी सांगितले की, वारंवार तक्रारी करूनही महापालिकेकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

यावेळी अरविंद म्हात्रे यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेत महापालिकेच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ''नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात महापालिका अपयशी ठरत आहे. पाणीटंचाईसारख्या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे अजिबात सहन केले जाणार नाही,'' असा इशारा त्यांनी दिला. तसेच, पाणीटंचाईने त्रस्त नागरिकांनी आगामी महापालिकेच्या महासभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करत ''या प्रश्नावर सभागृहात आक्रमकपणे जाब विचारला जाईल,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या समस्येवर तातडीने तोडगा काढावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# रात्री आठनंतर बस नसल्याने प्रवाशांचे हाल



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

पनवेलहून अलिबागला यायला रात्री ८ ते ८.३० वाजताची शेवटची बस असून त्यानंतर बाहेरून येतील त्या गाडीवर अवलंबून रहावे लागते. रेवदंडा, मुरुडसाठी पनवेल एसटी स्टँडमध्ये तसेच वडखळसाठी रात्री ८ ते ८.३० वाजेपर्यंतच शेवटची एसटी बस सुटते, अशी प्रवाशांमध्ये चर्चा आहे. यामुळे मुंबईतून रोजगारासाठी येणारे चाकरमानी रात्री लॉज शोधत राहतात किंवा सकाळपर्यंत स्टँडवर ताटकळत राहतात. 'रायगड जिल्हा परिषद सदस्य व आमदार एसटीतून प्रवास करत नसल्याने जनतेच्या समस्या त्यांना कळतच नाहीत,' असे सामाजिक कार्यकर्ते देवव्रत विष्णू पाटील यांनी सांगितले.

वडखळ हे रायगडचे मध्यवर्ती गाव असले तरी एसटीने येथील प्रवाशांची पूर्ण उपेक्षा केली आहे. रात्री ९ नंतर पनवेलहून वडखळला येण्यासाठी अलिबाग बस वगळता इतर कोकणमार्गी गाड्या प्रवाशांना घेत नाहीत, तर काही गाड्या स्टँडला येतच नाहीत, अशी राजेश म्हात्रे (वडखळ प्रवासी) यांची तक्रार आहे.

खासदार, आमदार व जिल्हापरिषद सदस्य एकही शब्द किंवा कारवाई करत नाहीत, ही मोठी शोकांतिका असून निवडून दिलेल्यांना घेराव घालावा, असा सूर जनतेमध्ये उमटत आहे. देवव्रत विष्णू पाटील यांनी वडखळ, अलिबाग, रेवदंडा, मुरुड प्रवाशांसाठी मार्ग काढण्याची मागणी केली आहे.

पनवेल व अलिबाग बस डेपोचा लेखाजोखा तपासला तर भ्रष्टाचार भरभरून निघेल, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे. प्रायव्हेट गाड्यावाले रांगेत उभ्या प्रवाशांना '३०० रुपये द्या, सोडतो' म्हणून लुटतात; एसटी अधिकाऱ्यांसोबत गुप्त समझोता असल्याचे सांगितले जाते. डेपोतील टेलिफोन नेहमी बिझी किंवा बंद असतात, अधिकाऱ्यांची भाषाही अरेरावीची असते.

मोदी सरकार व मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व समस्या सुटतील म्हटले तरी एसटी सेवेचे हाल वाढले आहेत. चालक-कंडक्टर कमतरता, जुन्या बस वेळापत्रक कोलमडलेले असल्याने प्रवासी त्रास सहन करत आहेत. तातडीने रात्रीच्या अतिरिक्त फेऱ्या, वडखळ थांबे व भ्रष्टाचार तपासाची मागणी जोर धरली आहे.



# जितेंद्र मुंडकर पुरस्काराने सन्मानित

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने पनवेल तालुक्यातील चिंचपाडा येथील जितेंद्र मुंडकर यांना सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांच्यातर्फे २५ आणि २६ मार्च रोजी मुंबई येथे पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

जितेंद्र मुंडकर यांनी व्यसन या चित्रपटाद्वारे गावागावात जाऊन स्वतःची गाडी घेऊन व्यसन या चित्रपटाच्या माध्यमातून नागरिकांचे, तरुणांचे प्रबोधन केले तसेच व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. गेली अनेक वर्ष मुंडकर यांनी हे काम केले. व्यसनामुळे अनेकांचे आयुष्य उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आता तरी व्यसन सोडा, असा मोलाचा सल्ला त्यांनी तरुणांना दिला. या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

# जलकुंड योजना शेतकऱ्यांसाठी ठरतेय वरदान



**● सुधागडपाली तालुक्यात ६२ जलकुंड पूर्ण**
**● संरक्षित सिंचनाची सुविधा**

**। सुधागडपाली । प्रतिनिधी ।**

जिल्हा वार्षिक योजना सन २०२५२६ अंतर्गत सुधागडपाली तालुक्यात मंजूर झालेल्या जलकुंड कामांची पाहणी तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शनही केले.

सुधागड तालुक्यात आतापर्यंत ६२ जलकुंडांची कामे पूर्ण झाली आहेत. मग्रारोहयो अंतर्गत करण्यात आलेल्या फळबाग लागवडीसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही जलकुंड उपयुक्त ठरत आहेत. यामुळे पाण्याची उपलब्धता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

कोकणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात आंबा, काजू व नारळ या पिकांची लागवड केली जाते. मात्र डिसेंबर ते मे या कालावधीत संरक्षित सिंचनाची सुविधा नसल्यामुळे जिवंत कलमांचे प्रमाण कमी राहते आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर जलकुंड योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जलकुंडामध्ये प्लास्टिक अस्तरीकरण (लाइनिंग) करण्यात येणार असून, एका जलकुंडात सुमारे ५२,७३१ लिटर पाणी साठवले जाणार आहे. १० ते २५ गुंठे क्षेत्रासाठी एक जलकुंड या प्रमाणे, जास्तीत जास्त दोन हेक्टर क्षेत्रासाठी आठ जलकुंडांचा लाभ शेतकरी घेऊ शकतात. संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यास फळबागा जिवंत राहण्याचे प्रमाण वाढेल आणि उत्पादनक्षमता सुधारेल. त्यामुळे जलकुंड योजना सर्वसामान्य फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा पुढाकार | एम.ए. हिंदू स्टडीज शिक्षणक्रम साहित्य लेखन**

# नाशिकमध्ये दोन दिवसीय कार्यशाळा




**। नाशिक । प्रतिनिधी ।**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात एम. ए. हिंदू स्टडीज शिक्षणक्रम विकसन अध्ययन साहित्य लेखन दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले, तर समारोप विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत उदयपुर, तिरुपतीसह महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, रामटेक, नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली येथील संस्कृत भाषेचे व एम. ए. हिंदू स्टडीज शिक्षणक्रमाचे जवळपास ६० हून अधिक तज्ज्ञ लेखक मार्गदर्शक सहभागी झाले.

हिंदू जीवनपद्धतीची मांडणी ही विज्ञानवादी दृष्टीने करता यावी, यासाठी एम. ए. हिंदू स्टडीज शिक्षणक्रम विकसन लेखकांची ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल, असा विश्वास मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी याप्रसंगी व्यक्त केला. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.जोगेन्द्रसिंह बिसेन यांनी माणसाला माणुसकीने जगण्याचे शिक्षण हिंदू संस्कृतीत असल्याचे सांगितले.

या कार्यशाळेत रामटेकच्या कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाच्या प्राध्यापिका प्रा. कलापिनी अगस्ती ('हिंदू स्टडीज शिक्षणक्रम: काळाची गरज आणि शैक्षणिक उपयुक्तता), मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या प्राध्यापिका डॉ. माधवी नरसाळे (जागतिक विद्यापीठातील हिंदू स्टडीज: ग्रंथ, विचार आणि परिवर्तन), विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले (अध्ययनसामग्री लेखनाचे प्रारूप आणि जबाबदारी), रामटेकच्या कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे संस्कृत भाषा आणि साहित्य विभाग प्रमुख प्रा. पराग जोशी (हिंदू स्टडीज शिक्षणक्रम: साहित्य व सामर्थ्यमूल्य), केरळच्या एर्नाकुलम येथील चिन्मय इंटरनॅशनल फाउंडेशनच्या शैक्षणिक संचालक प्रा. गौरी माहुलीकर, सेंटर फॉर हिंदू स्टडीज, मुंबई विद्यापीठाचे संचालक डॉ. रविकांत सांगुर्डे (हिंदू सण-उत्सव: वैज्ञानिक दृष्टीकोन), क.जे सोमैया धर्म अध्ययन संस्थान, सोमैया विद्याविहार विश्वविद्यालय, मुंबईचे इमेरिटस प्रोफेसर डॉ. कला आचार्य (भारतीय संस्कृतीत हिंदू धर्माचे आणि कर्माचे स्वरूप व प्रासंगिकता) यांनी विषयनिहाय मार्गदर्शन केले. त्यानंतर लेखक संवाद होवून अभिप्राय नोंदवण्यात आले.

# निवडक

## मध्य रेल्वे स्टेशनला व्हीलचेअरचे वाटप




**माथेरान :** दि सेंट्रल रेल्वे तिकीट चेकिंग स्टाफ वेल्फेअर ट्रस्ट मुंबई यांनी ३९ व्या वर्षात पदार्पण केले. याचे औचित्य साधून एक हात मदतीचा या उपक्रमांद्वारे दि सेंट्रल रेल्वे तिकीट चेकिंग स्टाफ वेल्फेअर ट्रस्ट, मुंबई आणि लायन्स क्लब ऑफ गार्डन व्ह्यू मुंबई, श्री स्वामी नारायण मंदिर कल्याण व रोटी डे ग्रुप, कल्याण यांच्या सहकार्याने व ट्रस्टचे सेवानिवृत्त ट्रस्टी एस.जी. दिक्षित यांच्या संकल्पनेतून मध्य रेल्वेच्या काही स्टेशनला व्हीलचेअर वाटप केले. यात छ. शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, ठाणे, कल्याण, लोकमान्य टिळक टर्मिनस, पनवेल या स्टेशनला प्रत्येकी एक असे सहा व्हीलचेअर स्टेशन मास्टर यांना त्या स्टेशनचे सीटीआय व ट्रस्टचे पदाधिकारी यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आले. छ. शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमामध्ये लायन्स क्लब ऑफ गार्डन व्ह्यू, मुंबईचे लायन्स फिरोज कात्रक, लायन्स पवन कुमार अग्रवाल, नितिन (रोटी डे ग्रुप, कल्याण), दिनेश ठक्कर (स्वामी नारायण हिल, कल्याण), रेल्वेचे मान्यवर अधिकारी प्रकाश कनोजिया साहेब, चंद्रकांत पगारे (स्टेशन डायरेक्टर), पंकज कुमार, प्रदीप कोरी साहेब (मुंबई), स्टेशन मॅनेजर व ट्रस्टचे अध्यक्ष डि.व्ही. चिंदरकर, सेक्रेटरी हरिश मोंडकर, खजिनदार गिरिश कदम, उपाध्यक्ष अभय कांबळे, ट्रस्टी शेखर तांबे, बाला पिल्लाई, आर.एम. बिरवटकर, प्रसाद करलकर, लीना गोरडे, सुचिता साळवी आणि कार्यशील सभासद सचिन सावंत, दिपक पापन उपस्थित होते.




## तिथीनुसार महावीर जयंती साजरी

**पनवेल :** नवीन पनवेलमध्ये सोमवारी (दि.३०) तिथीनुसार भगवान महावीर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने जैन समाजाच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत जैन बांधवांनी मोठ्या संख्येने उत्साहाने सहभाग नोंदविला होता. रथामध्ये भगवान महावीरांचा आकर्षक पुतळा विराजमान करण्यात आला होता. भगवान महावीरांच्या संदेशांचा प्रसार करण्यासाठी विविध फलक व घोषवाक्ये घेण्यात आली. विशेषतः लहान मुलांच्या हातात जनजागृतीपर बॅनर देऊन सामाजिक संदेश देण्यात आला. अहिंसा, सत्य आणि करुणा या तत्त्वांचा प्रचार रॅलीतून करण्यात आला. शिस्तबद्ध पद्धतीने रॅली शहरातील विविध मार्गांवरून काढण्यात आली. संपूर्ण परिसरात धार्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



## कर्जतमध्ये महावीर जयंती उत्साहात

**कर्जत :** कर्जत शहरांतील जैन बांधवांनी महावीर जयंती उत्साहात साजरी केली. या निमित्ताने महावीरांच्या प्रतिमेची मिरवणूक शहरातून काढण्यात आली. यावेळी जैन बांधवांनी 'जिओ और जिने दो'च्या घोषणांनी कर्जत शहर दणाणून सोडले होते. जैन बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. या मिरवणुकीत चौदा स्वप्नांच्या प्रतिकृतींचे आयोजन करण्यात आले होते. जैन मंदिरापासून निघालेली मिरवणूक बाजारपेठेतून लोकमान्य टिळक चौकमार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळून छत्री केंद्रमार्गे पुन्हा जैन मंदिराकडे आली. जैन बांधवानी व खास करून लहान मुलांनी नाचून मिरवणुकीची शोभा वाढवली. या मिरवणुकीत घोडे सुद्धा सहभागी करण्यात आले होते. यावेळी जैन समाजाचे बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, चोख पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता.

## महावीर जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर



**हमरापूर :** पेण शहरात भगवान महावीर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्री आदेश्वर भक्ती मंडळ पेण तर्फे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पेण जैन समाजाचे अध्यक्ष कीर्ती बाफना, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, नगरसेविका पल्लवी कालेकर, नगरसेवक प्रवीण पाटील, अशोक जैन, नगरसेवक मितेश शहा, डॉ. सुरेश जैन, डॉ. मंजुळा जैन, डॉक्टर दिलीप जैन, डॉ. आशा जैन, डॉ. धीरज जैन, सुभाष शेठ जैन, नरेश शेठ जैन, श्री आदेश्वर भक्तिमंडळाचे अध्यक्ष दिवेश पोरवाल, उपाध्यक्ष प्रकाश खांटेड, खजिनदार हितेश पोरवाल यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात जवळपास ५० जणांनी रक्तदान केले. तर रोटरी ब्लड सेंटर पनवेलच्या टीमने रक्तसंकलनाचे काम केले.



## महावीर जयंतीनिमित्त पालखी सोहळा

**नागोठणे :** जैन धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण सण असलेली भगवान महावीर यांची जयंती नागोठण्यातील जैन समाज बांधवांकडून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त नागोठण्यातील जैन मंदिरात विशेष पूजा-अर्चना केल्यानंतर नागोठण्यातील या पालखी सोहळा व शोभा यात्रेला सुरुवात झाली. श्री चंद्रप्रभस्वामी भगवान जैन मंदिरातून सकाळी काढण्यात आलेल्या पालखी सोहळ्यात जैन गुरु महाराज, नागोठण्यातील जैन समाज बांधव, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. ही पालखी बाजारपेठ, छ. शिवाजी महाराज चौक व नागोठण्यातील विविध भागात फिरविण्यात आली.

# निवडक



## मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील कशेळे येथे सोमवारी (दि.३०) मार्च रोजी ग्रामपंचायत कशेळे यांच्या माध्यामातून मुख्यमंत्री समृद्धी पंचायत अभियान अंतर्गत घंटागाडी अनावरण, महात्मा फुले सौर अभ्यासिका, शिवणकाम, ब्युटी पार्लर या प्रशिक्षणाचे लोकार्पण सोहळ्याचे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कर्जत पंचायत समिती सभापती नमिता घारे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. सभापती नमिता घारे, उपसभापती चित्रा ठाकरे यांच्या हस्ते महात्मा फुले सौर अभ्यासिका, शिवणकला व ब्युटी पार्लर प्रशिक्षण साहित्याचे उद्‌घाटन करण्यात आले. जिल्हा वर्षा दोरे-शेळके यांच्या हस्ते घंटागाडी अनावरण करण्यात आले. यावेळी चित्रा ठाकरे, वर्षा दोरे-शेळके, कवित पादीर, सुरेखा हरपुडे, रंजना धुळे, सुशांत पाटील, अनंत खैर, विजयसिंह राजपूत, कशेळे गावातील सामाजिक राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते, महिला वर्ग आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आत्माराम खंडागळे यांनी केले.



## म्हसळ्यात भव्य शोभा यात्रा

**म्हसळा** : म्हसळा येथील धावीरदेव महाराजांच्या यात्रेनिमित्त (दि.३१) मार्च रोजी शिरसवणे-महाड येथील खालू बाजाच्या पथककाच्या तालावर महिलांकडून लेझीम नृत्य करून धावीर महाराजांच्या पालखीची भव्य अशी शोभा यात्रा काढण्यात आली. धावीरदेव महाराज मंदिर ते संपुर्ण म्हसळा शहर व पुन्हा धावीर देव मंदिर अशी शोभा यात्रा काढण्यात करण्यात आली. या शोभा यात्रेत लहानापासून अगदी वृद्धापर्यत सर्व म्हसळावासीय सहभागी झाले होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत होता. मंदिरात पहाटे साडेपाच वाजता अभिषेक, पूजा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शोभा यात्रेत समीर बनकर, सुनील उमरोठकर, सुनील अंजर्लेकर, दिलीप पानसारे, अमर करंबे, भालचंद्र करडे, सुशील यादव, अनिकेत पानसरे, राखी करंबे, संजय कर्णिक, धावीर देव महाराज पुजारी म्हशीलकर बंधू, प्रसाद पोतदार, भालचंद्र दातार, अशोक काते, स्वप्निल चांदोरकर, अभय कळमकर, गौरी पोतदार, गौरव पोतदार, किरण पालांडे, प्रदीप कदम, अंकुश नटे,सौरव पोतदार, संपदा पोतदार, दिनेश म्हशीलकर, कविता बोरकर, नीता ढवळे, वासंती म्हशीलकर, शोभा म्हशीलकर, योगेश करडे, गौरव पोतदार, भाई बोरकर, प्रसन्न निजामपूरकर, बाबू शिर्के, महिला मंडळ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मुक्या प्राण्यांनी घेतला डबक्यांचा आधार

**पाताळगंगा** : उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्याने या तापमानाची झळ मुक्या प्राण्यांना बसत आहे. उन्हाच्या वाढत्या पाऱ्यामुळे मुक्या प्राण्यांनाही उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. मुक्या प्राण्यांना पाण्यात गेल्या शिवाय गारवा मिळत नाही. यामुळे गुरे पाण्यात राहून आपले शरीर थंड करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे. ग्रामीण भागामध्ये जनावरे बांधण्यासाठी झाडाच्या खाली बांधले जाते. परंतु सावली एका ठीकाणी स्थिर नसल्याने यांचा फटका मुक्या पाण्यांना बसत आहे. उन्हाच्या झळा असह्य होत असताना. आपल्या शरिराला थंडावा मिळवण्यासाठी या उद्देशाने पाण्याच्या आधार घेत असल्याचे दृश्य सध्या अनेक ठीकाणी पहावयास मिळत आहे.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जागा विकणे आहे** : आमची आक्षी स्तंभाजवळील २०.३ गुंठे जागा विकणे आहे. प्रवेश- अलिबाग रेवदंडा रोडवरून थेट कॉलनीचा मुख्य प्रवेश आहे. जागा पूर्ण सपाट आहे व जागेला पूर्ण कंपाऊंड आहे. जागेमध्ये २५ नारळाची व २५ सुपारीची झाडे आहेत. जागेचा प्रवेश पूर्व पश्चिम आहे. इच्छुकांनी थेट संपर्क करावा. संपर्क : ०९६१९०१६१३५
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **अलिबागमध्ये दुकान गाळा व अलिबागपासून** दोन-तीन किमी अंतरावर २२ गुंठे जागा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **रेडस्टोन हॉलिडे होम अँड स्पा या** रिसॉर्टसाठी वेटर आणि हाऊसकिपींग या कामासाठी पुरूष कामगार हवे आहेत. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली जाईल. पगार -१३००० रूपये **संपर्क** : ७७९८२४१०४०
- ***JOB VACANCY*** अलिबागमधे दवाखान्यामध्ये कामाला नर्स/रिसेपशनिस्ट पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२
- **कामासाठी माणसे पाहिजेत** इलेक्ट्रीकल्स, प्लंबर, टू व्हीलर मॅकेनिक, फ्रिज व एसी मॅकेनिक ७०६६१३८३६८
- **कंप्युटरवर कामासाठी ऑफिसमध्ये** मुलगी पाहिजे ७०६६१३८३६८


जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# शिलार धरण हटवा.. शेतकरी वाचवा

## ● प्रस्तावित धरणग्रस्तांकडून बॅनर बाजी ● ग्रामसभेचे ठराव मान्य करावेच लागणार

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील चिल्हार नदीवर होणाऱ्या शिलार धरणाला स्थानिक २३ गावातील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. शासनाला बाधित होणाऱ्या गावातील शेतकऱ्यांनी निवेदने दिले आहेत. शेतकऱ्यांनी मोर्चा काढला. मात्र, तरी देखील शेतकऱ्यांना धरण होण्याची भीती वाटत आहे. त्यामुळे शिलार धरण शेतकरी संघर्ष समितीने गावोगावी फलक लावून शेत जमिनीमध्ये कोणत्याही अधिकाऱ्याला पाऊल ठेवू देऊ नका असे आवाहन केले आहे.




चिल्लार नदीवर कीकवी येथे बांध घालून पाणी अडवले जाणार असून या धरणामुळे या भागातील २३ गावे आणि वाड्यांना विस्थापित व्हावे लागणार आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या या भागातील जमिनीला शेतकरी आपली आई मानतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी न देण्याचा निर्णय घेतला आहे.

मे २०२५ मध्ये धरण बांधण्याची घोषणा राज्य सरकारने केल्यानंतर या भागात सरकार विरोधी वातावरण तयार झाले आहे. धरण बांधण्याची घोषणा करणाऱ्या राज्याचे मुख्यमंत्री यांच्या पक्षाचे कार्यकर्ते आणि मतदार देखील धरणाच्या विरोधात ठामपणे उभे राहिले आहेत. त्यानंतर प्रस्तावित धरणामुळे बाधित होणाऱ्या गावातील शेतकऱ्यांनी ग्रामपंचायत स्तरावर १५ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत पाच ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांनी धरण नको म्हणून ठराव घेतले.

शेतकऱ्यांनी शिलार धरण हटाव संघर्ष समितीचे माध्यमातून गावोगावी बैठका घेऊन कर्जत तहसील कार्यालयावर १८ मार्च रोजी शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत मोर्चा काढला. मोर्चा काढल्यानंतर देखील धरण परिसरात येऊन शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये माती परीक्षण करण्याचे काम तसेच ड्रिल मारण्याची कामे केली जात आहेत. गावोगावी असे फलक लागले असून पाटबंधारे खाते किंवा ठेकेदार कंपनी यांचे अधिकारी या भागात पोहोचल्यास कायदा सुव्यवस्था यांचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

### शेतकरी संतप्त

**शेतकरी संतप्त झाला असून संघर्ष समितीचे वतीने सर्वत्र फलक लावून ड्रिल मारण्याची कार्यवाही करायला कोणीही अधिकारी आला तर त्याला पिटाळून लावण्याचा इशारा देण्यात आला आहे.**

## धानसरमध्ये हनुमान जन्मोत्सव सोहळा

**पनवेल** : धानसर गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही जय हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. गुरुवारी (दि.२) होणाऱ्या या सोहळ्यासाठी ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आयोजकांनी सर्व भाविकांना उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवण्याचे आवाहन केले आहे. या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने भाविक सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या सोहळ्याचे आयोजन श्री हनुमान जयंती उत्सव मंडळ, धानसर तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले, धार्मिक वातावरणात एकात्मता आणि भक्तीभावाचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे.

## वन विभागाच्या कारभारावर ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रश्नचिन्ह

| नवीन पनवेल | प्रतिनिधी|

ज्येष्ठ नागरिक संघ नवीन पनवेल यांनी मुरुड येथील वन विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित करत सखोल चौकशीची मागणी केली आहे. या संदर्भात संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे यांनी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जमीन प्रकरणासंदर्भात सादर करण्यात आलेल्या पत्रव्यवहारात अनेक त्रुटी आणि विसंगती असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेषतः ग्रामविकास विभाग, महसूल विभाग आणि वन विभाग यांच्यातील समन्वयाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

संबंधित जमीन वन विभागाच्या अखत्यारीत असताना ग्रामपंचायतीचा हस्तक्षेप कसा झाला, तसेच मोजणी, पाहणी आणि नकाशांबाबतची प्रक्रिया पारदर्शक का नाही, याबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करूनही त्याचा अहवाल सादर न केल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.

स्थानिक नागरिकांच्या जुन्या मार्गांबाबत निर्णय घेताना त्यांना विश्वासात का घेतले गेले नाही, असा सवालही करण्यात आला आहे. या सर्व बाबींमुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याचे संघाने नमूद केले आहे. या प्रकरणामुळे स्थानिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देत संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## वाहतूक समस्या सोडवण्यासाठी कर्जत पोलीस मित्र मंडळाचे सहकार्य

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरात वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. विशेषत कर्जत मधील चारफाटा, श्रीराम पुल, श्री छत्रपती संभाजी महाराज चौक, दहिवली येथे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडीचा त्रास सर्व वाहनचालक व नागरिकांना होत असतो. कर्जतमधील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी कर्जत पोलीस मित्र मंडळ सध्या सहकार्य करीत आहेत.

कर्जत शहर बचाव समिती ग्रुपवर ॲड. कैलास मोरे यांच्या नेतृत्वाखाली अनेक जणांनी या विषयावर चर्चा करुन उपाय योजना सुचविल्या. विवीध मार्गाने या विषयावर सुचना प्राप्त झाल्या. या सर्वांचा विचार करुन कुमार गोखले यांनी याबाबत एक



पोलीस मित्र मंडळ नावाने एक ग्रुप तयार करुन प्रत्यक्ष वाहतुक नियंत्रण या कामाचे आवाहन केले. यास अनेक नागरिकांचा पाठींबा मिळाला.

यानंतर गोखले यांचय नेतृत्वाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पाटील यांनी समाधान व्यक्त करुन सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या सेवेला आज दोन महिने पुर्ण झाले आहेत.

कर्जत पोलीस मित्र मंडळ या टीममध्ये विजय गोखले, विकास चित्ते, सतिश मुसळे, फिरोज शिकलगर, अशोक घोंगे पाटील, विजय ढेंगे, महेंद्र कर्वे, प्रमिला पाटील, भरत बामणे, गणेश गवई, अमित गडकरी, सुनिल दळवी, राजेंद्र वैशंपायन, दिनेश कदम, प्रथमेश थोरवे, श्रीनिवास राव, दिनेश गणेगा हे सदस्य सहकार्य करत आहेत.

## चौलमध्ये नारळ बागायतदारांना खत वाटप

### योग्य खत व्यवस्थापनातून उत्पादन वाढ शक्य

| चौल | प्रतिनिधी |

नारळ बागायतीत संतुलित खत व्यवस्थापन आणि आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन बागायतदारांचे उत्पन्न वाढू शकते, असे प्रतिपादन नारळ विकास मंडळाचे अधिकारी रवींद्रकुमार सिंग यांनी केले.



नारळ विकास मंडळ (ठाणे) आणि कृषक कल्याणकारी संस्था, चौल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ ते ३० मार्च रोजी चौल येथील डी. के. मनोहर ॲण्ड सन्स येथे आयोजित खतवाटप कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला परिसरातील नारळ उत्पादक बागायतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. उपक्रमांतर्गत पीआयसीसीएस योजनेद्वारे ८६ बागायतदारांना खतांचे वाटप करण्यात आले. तसेच सिंगल सुपर फॉस्फेट खताबरोबर आंतरपीक म्हणून मिरीच्या रोपांचे वितरण करण्यात आले.

यावेळी प्रमोद पाटील, रवींद्र पाटील, प्रकाश पाटील, वसंत घरत, विनायक थळकर, सुधाकर राऊळ, दिलीप पाटील उपस्थित होते.

> **बागायतदारांना आधुनिक शेती पद्धती स्वीकार करा. तसेच नारळ बागायतीत योग्य नियोजन, खत व्यवस्थापन आणि आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास उत्पादन वाढीसोबत उत्पन्नातही वाढ होऊ शकते. तसेच, शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत आपल्या शेतीत सुधारणा करावी आणि संघटितपणे पुढे आल्यास आपली प्रगती होण्यास मदत होईल. – रवींद्र पाटील**

## ‘स्वच्छता मोहिमेत नागरिकांनी सहकार्य करा’

| नागोठणे | प्रतिनिधी |

स्वच्छ नागोठणे, सुंदर नागोठणे आणि प्लास्टिक कचरामुक्त नागोठणे या मोहिमे अंतर्गत नागोठणे ग्रामपंचायतीकडून कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू करण्यात आले आहे. जनजागृती करणारी पत्रके वाटून, शहरात दवंडी देऊन, अनेक ठिकाणी स्वच्छता विषयक बॅनर लावून कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचे काम ग्रामपंचायतीकडून सुरू आहे. असे असतानाच काही नागरिक अद्यापही उघड्यावर कचरा फेकून देत असल्याने स्वच्छतेच्या या मोहिमेत अडथळा येत आहे. त्यामुळेच नागोठणे ग्रामपंचायतीच्या या शून्य कचरा मोहिमेत नागरिकांनीही सहकार्य करावे असे आवाहन सरपंच सुप्रिया महाडिक यांनी (दि.३०) दुपारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमार्फत केले आहे.

नागरिकांनीही सुका कचरा, ओला कचरा तसेच प्लास्टिक कचरा वेगळा जमा करून घंटागाडीत टाकून गावातील स्वच्छता मोहिमेत सहकार्य करायचे आवाहन त्यांनी केले. प्लास्टिक बंदीसाठी ग्रामपंचायतीने अनेक दुकानांवर दंडात्मक कारवाया करून प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या असल्याने प्लास्टिक पिशवी बंद मोहिमेला ६० ते ७० टक्के यश आले आहे.

स्वच्छता मोहीम टिकवून ठेवणे ही गावातील प्रत्येक नागरिकांची जबाबदारी असल्याने गावातील सर्व नागरिकांनी, महिलांनी जबाबदारीने वागून ग्रामपंचायतीच्या स्वच्छता मोहिमेत आपले मोलाचे योगदान द्यावे असे आवाहन यावेळी उपसरपंच अखलाक पानसरे यांनी केले.

याप्रसंगी सरपंच महाडिक, अखलाक पानसरे, राकेश टेमघरे, डॉ. मिलिंद धात्रक, ज्ञानेश्वर साळुंखे, प्रकाश कांबळे, पुनम काळे, शबाना मुल्ला, भाविका गिजे, ज्योती राऊत आदी उपस्थित होते.



## चिराठीत हनुमान जन्मोत्सव सोहळा

**म्हसळा** : चिराठी येथे हनुमान जन्मोत्सव सोहळा गुरुवार (दि.२) रोजी साजरा करण्यात येणार आहे. ग्रामस्थ मंडळाने भाविकांना सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. स्वदेश फाऊंडेशनतर्फे स्वप्नातील गाव या उपक्रमांतर्गत कार्यक्रम, हळदी-कुंकू कार्यक्रम, ग्रामस्थांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याचे आयोजन चिराठी ग्रामस्थ व महिला मंडळ, कन्या व नवयुवक विकास संघटना, हनुमान क्रिकेट संघाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

## शाळा-अंगणवाडीसाठी उपोषण सुरू

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील कोरळवाडी व दाभोळवाडी येथील आदिवासी बांधवांनी शिक्षण व बालकल्याणाच्या मूलभूत सुविधांसाठी अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. बुधवारी (दि.१) एप्रिलपासून पनवेल पंचायत समितीसमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

कोरळवाडी येथील १ ली ते ४ थीपर्यंतची प्राथमिक शाळा बंद करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. लहान मुलांना शिक्षणासाठी दूरवर जावे लागत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. तसेच कोरळवाडी व दाभोळवाडी येथे सुमारे दहा महिन्यांपूर्वी मंजूर झालेल्या अंगणवाडी इमारतींचे बांधकाम अद्याप सुरू झालेले नाही. ग्रामविकास अधिकारी, ठेकेदार, महिला व बालकल्याण विभाग तसेच वनजमीन हस्तांतरण प्रक्रियेमध्ये झालेल्या विलंबामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अंगणवाडीच्या अभावामुळे बालकांना सुरक्षित व आवश्यक सुविधा मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा निर्णय घेतला. ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या उपोषणात सुवर्णा वाघे, सोनाली पवार, प्रगती वाघे यांनी सक्रिय सहभाग आहे. जोपर्यंत शाळा पुन्हा सुरू होत नाही आणि अंगणवाडी बांधकामाला तात्काळ सुरुवात होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, असा ठाम इशारा आंदोलकांनी दिला आहे. या आंदोलनास मयूर शेलार, राजेंद्र पाटील, स्वप्नील भोवड, महेश पाटील, राजू पाटील, जयवंत पाटील, राजेश रसाळ, रोहिणी ठाकूर आदींनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला आहे.

## हवामान बदलाची माहिती ऑनलाइन शेतकऱ्यांचा सत्राला मोठा प्रतिसाद

# कर्जत तालुक्यात शेती शाळा उपक्रम

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात घुमणार आधुनिक शेतीचा मंत्र देण्यासाठी कृषी विभाग सरसावला आहे. नानाजी देशमुख प्रकल्प आणि पाणी फाऊंडेशनतर्फे डिजिटल शेती शाळा उपक्रम सुरू झाला आहे. ऑनलाईन पद्धतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यास सुरुवात झाली असून शेतकऱ्यांनी या सत्राला मोठा प्रतिसाद दिला आहे.

हवामानातील अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च आणि नवनवीन रोगांचा प्रादुर्भावामुळे सध्या शेती व्यवसाय आव्हानात्मक बनला आहे. या आव्हानांवर मात करून शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर करण्यासाठी नानाजी



देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यात डिजिटल शेती शाळा हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यास सुरुवात झाली आहे. बदलूया रीत शेतीची, वाढवूया रास समृद्धीची या ब्रीदवाक्यासह सुरू होणाऱ्या या मोहिमेत कर्जत तालुक्यातील सर्व शेतकरी या ऑनलाइन शाळेत सहभाग घेताना दिसत आहेत. बदलत्या हवामानानुसार तंत्रज्ञानाची सांगड कर्जत तालुका हा भात शेतीसाठी प्रसिद्ध आहे. गेल्या काही वर्षांत पावसाचे बदललेले स्वरूप आणि वाढत्या उष्णतेमुळे पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. यावर उपाय म्हणून हवामान अनुकूल तंत्रज्ञान ही संकल्पना या शेती शाळेच्या केंद्रस्थानी आहे. ही शाळा पूर्णपणे मडिजिटलफ असून, शेतकरी आपल्या स्वतःच्या गावातून, आपल्याच मोबाईलवरून तज्ज्ञांशी संवाद साधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.

डिजिटल शेती शाळा एप्रिल महिन्यात चार महत्त्वाच्या टप्प्यांत विभागली गेली आहे. खरीप हंगामाच्या सुरुवातीला करण्यात येणारी तयारी म्हणजे निम्मी शेती जिंकण्यासारखे आहे. बियाण्यांची निवड, जमिनीची मशागत आणि हवामानाचा अंदाज घेऊन पेरणीचे नियोजन कसे करावे, याचे तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. कर्जत आणि कशेळे परिसरातील शेतकऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे मार्गदर्शनासाठी कुठे बाहेर जाण्याची गरज नाही.

> **तालुक्यातील सर्व प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी आणि युवा पिढीला या डिजिटल प्रवाहात सामील होण्याचे आवाहन केले आहे. आपल्या शेतीची रीत बदलण्याची वेळ आली आहे. तरच आपण आपली समृद्धीत वाढ होईल.**
> **दिनेश कोळी, तालुका कृषी अधिकारी, कर्जत**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 02/04/2026**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता/रत्नागिरी विभागांतर्गत सीआरओ ठिकाणी काटेरी तारांचे कुंपण उभारणे. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-09, अंदाजित खर्च:** ₹41,76,912/-, **ईएमडी** ₹83,500/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 22/04/2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुभाष दामोदर घरत, गुलाब पंढरीनाथ म्हात्रे, सुनंदा दत्तात्रेय घरत, विनय दत्तात्रेय घरत, नम्रता अरविंद रावते, संगिता दत्तात्रेय घरत, कुंदा अनंत घरत, प्रणय अनंत घरत, स्मिता राजेंद्र पडते, वृषाली विनोद पडते, सिमा गणेश राउत, शमिका शरद घरत, शर्मिला शरद घरत, परेश शरद घरत, विशाल गुरूनाथ म्हात्रे वैभवी सागर साने यांचे कडुन खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| २०२ | ०-७०-० | १.४१ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २/४/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँके शेजारी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती व घर मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक महेश जयवंत तावडे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे गाण तर्फे श्रीगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ११ | ००-११-९० | २.७५ |

आणि या मिळकतीमध्ये उभी असलेली ग्रुप ग्रामपंचायत खिडकी, ता. अलिबाग जिल्हा रायगड मालमत्ता क्र.८७, क्षेत्र ७८.२८ चौ.मि., क्र.८८, क्षेत्र ४४.१४ चौ.मि. क्र. ८९, क्षेत्र १८.५८ चौ.मि. ची बांधकामे

वर नमूद मिळकतींमध्ये कोणा व्यक्ती आर्थिक संस्था, बँका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ. एस. आय. टी. डी. आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०२/०४/२०२६

**ॲड. रविंद्र वि.ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक सौ. वासंती अशोक पाटील यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ४२ | ७ | १-४६-०० | ०-७२ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हकहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०४/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

तारीख : ०१/०४/२०२६

आमचे अशिल १. श्री. संजय सदानंद गावंड, २. श्रीमती. माधवी महादेव नाईक व ३. श्रीमती प्रतिक्षा प्रदिप म्हात्रे, नं. १ व ३ रा. मांडवा, ता. अलिबाग, जि. रायगड, नं. २ रा. परहुरपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, यांनी दिलेल्या माहितीवरून जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणेः

१) आमचे अशिलांनी अलिबाग जिल्हा न्यायालयात अलिबाग कोर्टातील रे.मु.नं. १४७/२००९ चे निर्णयाविरूद्ध विलंब माफीच्या अर्जासह अपिल दाखल केलेले आहे. त्याचा नंबर दिवाणी चौकशी अर्ज नं. ९/२०२० असा आहे. सदर प्रकरणात मौजे धोकवडे येथील गट नं. २८३ व २०५ या मिळकती संदर्भात वाद प्रलंबित आहे.

२) तसेच आमचे अशिलांनी दिवाणी चौकशी अर्ज नं. ९/२०२० मध्ये मे. सोबो इस्टेट डेव्हलपमेंट प्रा. लि. आणि मे. सि. साईड ॲग्रोटेक प्रा.लि. यांना पार्टी करण्याचा अर्ज दिलेला आहे.

३) तसेच जिल्हा न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज नं. ३१/२०२० चे प्रकरणही प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत कोणीही सुरेश रघुनाथ म्हात्रे, विजय रघुनाथ म्हात्रे दोघे रा. मांडवा यांचेशी वर नमुद मिळकतीबाबत कोणताही कसलाही व्यवहार करू नये केल्यास सर्वजण कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ऑफीस पत्ता: वसंत पुष्प, १ला मजला,
कोर्ट रोड अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

सही/-
**ॲड. डी. एन. जोशी**

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल संजय तुकाराम म्हसेपाटील हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक विवेक चैतण्या कोका, विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :**

**मौजे-कळंब, ता-सुधागड, जि-रायगड**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|
| १०/ब/प्लॉट नंबर १२ | बिनशेती प्लॉट, एकूण क्षेत्र ३-५४-०० | ३५-४० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. ०२/०४/२०२६

सही/-
ॲडव्होकेट. **तुषार गणेश कानडे**
कार्यालय-कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-16/ 25-26/ Rfx **No. 7000039460** | Scheme for SITC of 1 No. of 22kV Bay for MSEDCL at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Division Nagothane…**1st call** | **Rs. 26,54,866.83** | **14.04.2026 up to 23:59 hrs** |

**EMD 1 % of estimate Cost i.e. 26,548.66,** Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) **Mob No.:** 9461456635 **Email ID:** ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती. गंगाबाई गजानन थळे, २) श्रीमती. गंगुबाई केशव पाटील, ३) श्री. प्रसाद सुनिल थळे, ४) श्री. आदित्य सुनिल थळे, ५) गणेश गोविंद थळे, ६) श्रीमती. लक्ष्मी नारायण थळे, ७) श्री. राजकुमार नारायण थळे, ८) श्री. जितेंद्र नारायण थळे, ९) श्रीमती. नंदा निलेश कुली, १०) श्रीमती. महानंदा विश्वास थळे व ११) श्रीमती. स्वाती आशिष महाडीक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलपाडा | ९ | ०-१६-८० | २.५० |
| | | पो.ख. ०-००-५० | |
| | | ०-१७-३० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०२/४/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. राम काशिनाथ पाटील व २) श्री. नाथा काशिनाथ पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलपाडा | ६ | ०-२७-०० | ४.०६ |
| | | पो.ख. ०-००-८० | |
| | | ०-२७-८० | |

पैकी १) श्री. राम काशिनाथ पाटील व २) श्री. नाथा काशिनाथ पाटील यांचे अविभक्त हिश्यापैकी ० हे २ आर एवढी मिळकत.


सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०२/४/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि -नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी मौजे अडुळसे, तालुका सुधागड जिल्हा रायगड येथिल मिळकती त्यांचे मूळ मालक श्रीम.श्रद्धा गौरव गवाणकर, रा. अडुळसे, ता. सुधागड, जि. रायगड यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| गांव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भूधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| अडुळसे | ६८/अ | १६-२२-०० पैकी लिहून देणार यांचे क्षेत्र ०-२०-०० | १७-४२ | वर्ग-१ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे तमाम जनतेस कळावे.

पाली
दिनांक ०२/०४/२०२६

**(ॲड. अमोल रामचंद्र कांबळे)**
मु.पो.पाली ता.सुधागड
जि.रायगड मो.९०२८२४८५१७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - मोग्रज, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी.से.मी. | आकारणी रुपये | आकारणी रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. केतन सुधाकर मुसळे<br>२) श्री. धिरज चापशी शहा<br>३) श्री. वृंदावन पांडुरंग वाणी | ८४/३ | १ ते १११ | एकूण क्षेत्र ४५५-००-०० म्हणजेच ४५५०० चौ.मी | ८६२६ | ५३ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : ०२/०४/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७

दिवाणी अ ९ म
वाद प्रश्न नक्की करण्यासाठी
समन्स (दिवाणी व्यवहार
संहिता, नियमक्रम ५ नियम
१.५ ) अनुसूची एक
परिशिष्ट ग,क. २.

### समन्स

वादीचे वकील स्नेहल पाटील,

**अलिबाग येथील मा. श्री. अमोल शिंदे, सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

नियमित दिवाणी दावा ६४/२०२५
निशाणी क्रमांक ६५/ड

ने.ता. १५/०६/२०२६

देवेंद्र मधुकर लोहटे .. वादी
विरुध्द
रमेश दत्तात्रेय पाटील. प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी क्र.५ सलिम अमजदअली शेख,
रा. रामनाथ, ता. अलिबाग, जि. रायगड
आणि रा. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड

ज्याअर्थी, उपरिनामित वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे. सोबतच्या नकलेप्रमाणे.

त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता तुम्ही स्वतःकिंवा ज्यास योग्यरीत्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर येऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निदेश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काऊंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ ) किंवा प्रतिवादाच्या (काऊंटर क्लेम) पुष्ठ्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर न मूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बचावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर, अलिबाग- रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पोही, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| जमिन मालक | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्री. सतिश व्ही बागलकर | ३० | १०/ब | ०-२१-० | ०-२० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०४/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे फुफादेवीपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विश्वनाथ शांताराम पाटील, यांचेकडून मिळकतीचे सह-मालक १) श्री.गोपीनाथ शांताराम पाटील, २) श्रीमती.शशिकला रामनाथ ठाकूर, ३) श्रीमती. विठाबाई शांताराम पाटील, ४) श्रीमती. शकुंतला वामन मोकल, ७) श्री. प्रफुल्ल जगन्नाथ घरत, ६) श्री. रूपेश जगन्नाथ घरत व ७) श्री. सर्वेश जगन्नाथ घरत यांचे संमतीने कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| फुफादेवीपाडा | १३/१/१ | ०-३०-६० | ८.१२ |
| | | पो.ख. ०-०२-०० | |
| | | ०-३२-६० | |

पैकी विश्वनाथ शांताराम पाटील यांच्या अविभक्त हिश्याचे क्षेत्र (सुमारे ० हे. ४ आर) ही मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०२/४/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक शंकर हरिभाऊ दिसले यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे खांडपे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २३/१ | एकुण क्षेत्र ०-५८-५० हे आर पॉ | १०-१८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०२/०४/२०२६

खरेदीदारातर्फे वकील **ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर अमराई
रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

दिवाणी अ ९ म
वाद प्रश्न नक्की करण्यासाठी
समन्स (दिवाणी व्यवहार
संहिता, नियमक्रम ५ नियम
१,५) अनुसूची एक
परिशिष्ट ग,क. २.

### समन्स

वादीचे वकील स्नेहल पाटील,

**अलिबाग येथील मा. श्री. अमोल शिंदे, सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

नियमित दिवाणी दावा ६४/२०२५
निशाणी क्रमांक ६४/ड

ने.ता. १५/०६/२०२६

देवेंद्र मधुकर लोहटे .. वादी
विरुद्ध
रमेश दत्तात्रेय पाटील. प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी क्र.६- राजीकअली मोहम्मद सिद्दकी,
रा. रामनाथ, ता. अलिबाग, जि. रायगड
आणि रा. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड

ज्याअर्थी, उपरिनामित वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे. सोबतच्या नकलेप्रमाणे.

त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता तुम्ही स्वतःकिंवा ज्यास योग्यरीत्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर येऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निदेश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काऊंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ ) किंवा प्रतिवादाच्या (काऊंटर क्लेम) पुष्ठ्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बचावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर, अलिबाग- रायगड**

## निवडक

### मॅक्सवेल-रिचर्डसनचे पॅकअप

**ऑस्ट्रेलिया :** ऑस्ट्रेलिया क्रिकेट बोर्डने २१ खेळाडूंची सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट यादी जाहीर केली आहे. या करारामध्ये विशेषतः कसोटी आणि मल्टी-फॉर्मेट खेळाडूंना प्राधान्य देण्यात आले आहे. ग्लेन मॅक्सवेल, मॅथ्यू शॉर्ट, झाय रिचर्डसन, लान्स मॉरिस आणि निवृत्त झालेले उस्मान ख्वाजा यांना करारातून वगळण्यात आले आहे. रिचर्डसनला तर मागच्या वेळीच करार मिळाला होता, पण एका वर्षाच्या आतच त्याला बाहेर काढण्यात आले. सलामीवीर जॅक वेदराल्ड आणि वेगवान गोलंदाज मायकेल नेसर यांचा संघात समावेश करण्यात आला आहे. नेसरने नुकत्याच झालेल्या ॲशेस मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केली होती, ज्यामुळे त्याला यावेळी कॉन्ट्रॅक्ट यादीत स्थान मिळाले आहे. झेवियर बार्टलेट, स्कॉट बोलँड, ॲलेक्स कॅरी, पॅट कमिन्स, ब्रेंडन डॉगेट, नॅथन एलिस, कॅमेरॉन ग्रीन, जोश हेजलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुह्नेमन, मार्नस लाबुशेन, नॅथन लायन, मिचेल मार्श, टॉड मर्फी, मायकल नेसर, स्टीव्ह स्मिथ, मिचेल स्टार्क, जॅक वेदराल्ड, ब्यू वेबस्टर, ॲडम झम्पा यांचा समावेश आहे. ऑस्ट्रेलिया संघ पुढील १२ महिन्यांत एकूण १५ कसोटी सामने खेळणार आहे. यात बांगलादेशविरुद्ध घरच्या मैदानावर २ कसोटी, दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर ३ कसोटी, न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर ४ कसोटी आणि भारत दौऱ्यावर ५ कसोटी सामन्यांचा समावेश आहे. २०२७ च्या मध्यावर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना खेळला जाऊ शकतो, तर त्याच वर्षी इंग्लंड दौऱ्यावर पाच कसोटी सामन्यांची ॲशेस मालिका देखील असेल. कसोटी क्रिकेटव्यतिरिक्त, ऑस्ट्रेलिया संघ झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर, तर इंग्लंडविरुद्ध घरच्या मैदानावर व्हाइट-बॉल मालिका देखील खेळणार आहे.

### झिम्बाब्वे दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर

**हरारे :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने बुधवारी टीम इंडियाच्या झिम्बाब्वे दौऱ्यातील वेळापत्रकाची घोषणा केली आहे. भारतीय संघ या दौऱ्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. बीसीसीआने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, २३ जुलै ते २५ जुलै या दरम्यान भारत-झिम्बाब्वे यांच्यातील द्विपक्षीय मालिका खेळवण्यात येणार आहे. या मालिकेत सर्व सामने झिम्बाब्वेतील हरारेच्या मैदानात खेळवण्यात येतील. २३ जुलै , २०२६ झिम्बाब्वे विरुद्ध भारत, पहिला टी-२० सामना, हरारे २५ जुलै, २०२६ झिम्बाब्वे विरुद्ध भारत, दुसरा टी-२० सामना, हरारे२६ जुलै, २०२६ झिम्बाब्वे विरुद्ध भारत, तिसरा टी-२० सामना, हरारे येथे होतील. २०२४ मध्ये शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारताने जुलै २०२४ मध्ये झिम्बाब्वे दौरा केला होता. या दौऱ्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत पहिल्या सामन्यात टीम इंडियाला १३ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला होता. मात्र त्यानंतर उर्वरित चारही सामने जिंकून टीम इडियाने मालिका ४-१ अशी जिंकली होती. झिम्बाब्वेचा संघही पुढील वर्षी जानेवारीमध्ये भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. आगामी वनडे वर्ल्ड कप स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खळवण्यात येईल. या मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना कोलकाता, दुसरा हैदराबाद तर तिसरा आणि अखेरचा एकदिवसीय सामना मुंबईत नियोजित आहे. झिम्बाब्वे दौऱ्यावर स्टार खेळाडूंना विश्रांती देऊन काही नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा डाव बीसीसीआयकडून खेळला जाऊ शकतो.

### श्रेयांशची विजयी घोडदौड



**मुंबई :** श्रेयांश सोमैयाने सर्वोत्तम फॉर्म कायम राखताना तिसऱ्या अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर्स स्पर्धेमध्ये सलग तिसरा विजय नोंदवला. त्याने यासह स्पर्धेत संयुक्तपणे आघाडी मिळवली. श्रेयांशसह आश्वी अग्रवाल, सोहम पवार, पलाश मापारा, प्रतीक यादनीक, राजवीर नहार, अनिरुद्ध अय्यर आणि अहान कातरूका यांनीही प्रत्येकी ३ गुणांसह संयुक्तपणे अग्रस्थान मिळवले. पेडर रोड येथील मुंबई चेस सेंटरमध्ये सुरू असलेल्या स्पर्धेत पहिल्या बोर्डवर सोमैयाने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना दमदार फॉर्ममध्ये असलेल्या अथर्व पोलेकरचा (२ गुण) पराभव केला. संथ सुरुवात केल्यानंतर सोमैयाने अप्रतिम चाली रचत अथर्वची कोंडी करत त्याला चुका करण्यास भाग पाडले. पाचव्या बोर्डवर पलाश मापारानेही काळ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रेयस वाघमारेचा (२ गुण) पराभव करत सलग तिसरा विजय मिळवला. एएफएम सोहम पवारने सफेद मोहऱ्यांनी खेळताना सुरुवातीपासून नियंत्रण राखून अनिश कश्यपचा पराभव केला.

### श्रेयस अय्यर पुढच्या सामन्याला मुकणार?



**मुंबई :** गेल्या वर्षी पंजाब किंग्स संघाने दमदार खेळ दाखवला. पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरने अप्रतिम कामगिरी केली होती. या हंगामात त्याच्या संघाने ठिकठाक सुरुवात केली. पण श्रेयस अय्यरला मात्र पहिल्याच सामन्यात दुखापतीचा सामना करावा लागला. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात त्याच्या हाताला दुखापत झाली. सामन्यानंतर जेव्हा त्याला पहिला प्रश्न त्याच्या हाताच्या दुखापतीबद्दल विचारण्यात आला, तेव्हा श्रेयस अय्यरने यावर प्रतिक्रिया दिली.पंजाब किंग्सच्या डावादरम्यान श्रेयस अय्यरला दुखापत झाली. पंजाबच्या डावाच्या १२व्या षटकात, गुजरातचा फिरकी गोलंदाज रशीद खानचा पाचवा चेंडू कूपर कॉनोलीने टाकला. त्या फटक्याचा वेग इतका होता की, नॉन-स्ट्रायकरच्या टोकाला उभ्या असलेल्या श्रेयस अय्यरला सावरण्याची संधीच मिळाली नाही आणि चेंडू थेट त्याच्या डाव्या हातावर आदळला. चेंडू लागल्यानंतर अय्यर वेदनेने कळवळला. त्यामुळे वैद्यकीय पथकाने मैदानावरच त्याची तपासणी केली. मॅजिक स्प्रे लावल्यानंतर तो पुन्हा खेळू शकला. पण हाताच्या दुखापतीच्या तीव्रतेबद्दल अनेकांना प्रश्नचिन्ह होते. त्यावर अय्यरनेच उत्तर दिले. सर्वप्रथम, श्रेयस अय्यरने त्याच्या दुखापतीबद्दल माहिती सांगितली. बोटाच्या दुखापतीबद्दल, श्रेयस अय्यर सामन्यानंतर म्हणाला की त्याला बरे वाटत आहे. काहीही झालेले नाही. सर्व काही पूर्ववत झाले आहे. उगाच वेगळे काहीतरी सांगून मला अशुभ संकेत द्यायचे नाहीत. मला सकारात्मक राहायचे आहे आणि आशा आहे की सर्व काही ठीक होईल.

# पंजाब किंग्सचा गुजरातवर विजय



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्स यांच्यात आयपीएल २०२६ मधील सामना चांगलाच अटीतटीचा झाला. अखेरच्या षटकांपर्यंत सामन्याचं माप सातत्याने दोन्ही बाजूच्या दिशेने झुकत होता. कधी गुजरातचे गोलंदाज तर कधी पंजाबचे फलंदाज बाजी मारत होते. पण अखेरीस पंजाब किंग्सने विजय आपल्या बाजूने झुकवला. पंजाब किंग्सच्या या विजयाचा हिरो कुपर कॉनोली ठरला. एका टोकाकडून लागोपाठ विकेट्स पडत असताना कॉनोलीने एकट्याने संघाचा डाव सावरला आणि संघाला विजय मिळवून देतच माघारी परतला.

गुजरातने दिलेल्या १६३ धावांचा पाठलाग करताना प्रियांश आर्यने षटकाराने सुरूवात केली. पण रबाडाच्या चेंडूवर तो झेलबाद झाला. यानंतर कुपर कॉनोली व प्रभसिमरन सिंग यांनी दुसऱ्या विकेटसाठी ७६ धावांची भागीदारी रचली. प्रभसिमरन २४ चेंडूत ३७ धावा करत बाद झाला. तर श्रेयस अय्यर २ दणदणीत षटकार लगावत बाद झाला. पंजाबची स्थिती एका वेळेस ११० धावांवर २ विकेट्स अशी होती आणि लागोपाठ विकेट्स गमावल्यानंतर संघाने ११८ धावांवर ६ विकेट्स गमावल्या.

प्रसिध कृष्णाला इम्पॅक्ट प्लेअर म्हणून १२ व्या षटकात गोलंदाजीला आणलं आणि त्याने २ षटकांत ३ विकेट्स घेत पंजाबपासून सामना दूर नेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान एका टोकाकडून विकेट्स पडत असताना पदार्पणवीर कुपर कॉनोलीने अर्धशतक झळकावत संघाचा डाव सावरत होता. मार्को यान्सनने कॉनोलीला चांगली साथ दिली. पण १८व्या षटकात यान्सन अशोक शर्माच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. यानंतर आलेल्या झेवियर बार्टलेटने प्रसिद्ध कृष्णाच्या १९व्या षटकात षटकार खेचला आणि संघाला विजयाच्या अधिक जवळ नेलं.



पंजाब किंग्सने सामन्याची नाणेफेक जिंकत गुजरातला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. गुजरातकडून साई सुदर्शन व शुबमन गिलच्या जोडीने सावध सुरूवात केली. पण मार्को यान्सने साईला बाद करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. त्यानंतर शुबमन गिल व जोस बटलरने सावध फलंदाजी केल्या. गिल २७ चेंडूत ३९ धावा करत बाद झाला तर जोस बटलरने ३८ धावांचं योगदान दिलं.

ग्लेन फिलिप्स २५ धावा आणि वॉशिंग्टन सुंदरने १८ धावांचं योगदान देत संघाला १६२ धावांपर्यंत नेलं. श्रेयस अय्यरचं उत्तम नेतृत्त्व आणि गोलंदाजीत बदल केल्यामुळे गुजरातला फारशा धावा करण्याची संधी मिळाली नाही. पंजाबकडून मार्को यान्सनने १ विकेट तर युझवेंद्र चहलने २ आणि विजयकुमार वैशाकने प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या.

## आत्माराम मोरे स्मृती क्रिकेट स्पर्धेत जेजे हॉस्पिटल अजिंक्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती चषक आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेत जेजे हॉस्पिटलने रोख पुरस्कारासह अजिंक्यपद पटकाविले.

अंतिम सामन्यात जेजे हॉस्पिटलने नाणेफेक जिंकून ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलला प्रथम फलंदाजी दिली. सलामीवीर प्रदीप क्षीरसागर लवकर बाद झाल्यावर शंतनू मोरे व इसाकी मुत्थू यांनी डाव सावरला. परिणामी ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलने मर्यादित २० षटकात ८ बाद १५१ धावांचे आव्हान प्रतिस्पर्ध्यांना दिले. सुभाष शिवगण व अक्षय सावंत यांनी छान गोलंदाजी केली. विजयी धावांचे लक्ष्य साकारण्याच्या हाराकीरीत प्रकाश सोळंकीने एका बाजूने आक्रमक फलंदाजी करूनही जेजे. हॉस्पिटलची नवव्या षटकाला ६ बाद ५७ धावा अशी दयनीय अवस्था रोहन महाडिक व सुदेश यादव यांच्या गोलंदाजीने केली. आठव्या क्रमांकावर फलंदाजीस उतरलेल्या अर्धशतकवीर अक्षय सावंतने षटकार-चौकारांच्या आतषबाजीने विजयाचे पारडे जेजे हॉस्पिटलच्या बाजूने झुकविले. कप्तान नरेश शिवतरकरने शेवटच्या चेंडूवर चौकार ठोकून जेजे हॉस्पिटलच्या विजयावर ८ बाद १५५ धावसंख्या रचून शिक्कामोर्तब केला. तृतीय क्रमांकाच्या साम न्यात लीलावती हॉस्पिटलने रहेजा हॉस्पिटलचे आव्हान ७ विकेटने संपुष्टात आणताना कप्तान मनोहर पाटेकर (३१ धावा), संदेश पंधेरे व संदीप कणसे चमकले. नितेश मस्के व भूषण सावंत यांनी शर्थीचे प्रयत्न करूनही रहेजा हॉस्पिटलला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

## क्रीडा शिष्यवृत्तीतही बॉक्सरांचाच दबदबा

**। अकोला । वृत्तसंस्था ।**

जिल्ह्यात इतर खेळांच्या तुलनेत सतत आघाडीवर असणाऱ्या बॉक्सरांनी पदकांच्या कमाईसह क्रीडा शिष्यवृत्तीतही आघाडी घेत आपला दबदबा कायम ठेवला आहे. राज्य शासनाकडून मिळणाऱ्या क्राडी शिष्यवृत्तीत जिल्ह्यातील ४३ खेळाडूंपैकी तब्बल २१ बॉक्सरांची निवड झाली आहे हे विशेष. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील खेळाडूंना महाराष्ट्र शासनाकडून मोठा दिलासा मिळाला असून, एकूण ४३ खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये विशेष म्हणजे २१ खेळाडू बॉक्सिंग क्रीडा प्रकारातील असून, जिल्ह्यातील बॉक्सिंग खेळाची वाढती ताकद अधोरेखित झाली आहे.

### सोनारसिद्ध चषक क्रिकेट स्पर्धा

## जोगीरदेव पोस्टाची वाडी संघ अंतिम विजेता

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

कोलाड क्रिकेट असोसिएशनशी संलग्न असलेल्या सोनारसिद्ध धाटाव क्रीडा मंडळ आयोजित दिवंगत लोकनेते भाईसाहेब पाशीलकर यांच्या स्मरणार्थ सोनारसिद्ध चषक क्रिकेट स्पर्धेत जोगीरदेव पोस्टाची वाडी संघ अंतिम विजेता ठरलेला आहे. सोमजाई तीसे आणि जोगीर देव पोस्टाची वाडी या दोन संघांमध्ये अटीतटीच्या लढाईमध्ये अखेर जोगीरदेव पोस्टाची वाडी संघाने बाजी मारली आणि सोनारसिद्ध क्रिकेट चषकावरती आपली विजयाची मोहोर उमटवताच विजेत्यांनी मैदानात आनंदाचा जल्लोष केला.



रोहा तालुका क्रीडा संकुलाच्या भव्य प्रांगणात नुकत्याच झालेल्या क्रिकेट स्पर्धेत जोगीरदेव पोस्टाची वाडी या संघाने प्रथम क्रमांक, सोमजाई तीसे या संघाला द्वितीय क्रमांक श्री क्षेत्र पालवी संघाला तृतीय तर श्रीराम महादेव वाडी या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला आहे.वैयक्तिक पारितोषिकांमध्ये सामनावीर म्हणून राज बिरगावले, मालिकावीर राज बिरगावले, उत्कृष्ट फलंदाज प्रेम कदम, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून मनिष कुचेकर यांना घोषित करण्यात आले. सायंकाळी उशिरापर्यंत संपन्न झालेल्या स्पर्धेतील विजेत्यांना उपस्थित मान्यवरांकडून पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन आयोजक सातिश जाधव यांसह महेंद्र रटाटे, उमेश खैरे, नितेश जाधव, ज्ञानेश्वर जाधव, शुभम मोरे, साहील जाधव, गीतेश बामुगडे, रूपेश रटाटे, प्रविण मालुसरे, भावेश ठमके, रूतिक जाधव, पांडुरंग जाधव, चंद्रकांत रटाटे यांनी केले होते. संपूर्ण स्पर्धेचे समालोचन रोहीत शेलार आणि रूपेश रटाटे यांनी केले.

## पाकिस्तानच्या फखर जमानवर बंदी

**। कराची । वृत्तसंस्था ।**

पीएसएल बॉल टेम्परिंग वादात दोषी आढळल्यानंतर, पाकिस्तानचा फखर जमानवर दोन सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. लाहोर कलंदर्स विरुद्ध कराची किंग्स यांच्यातील साम न्यावेळी फखर जमान बॉल टेम्परिंग करताना आढळला होता. लाहोर कलंदर्स विरुद्ध कराची किंग्स यांच्यात सामना झाला. खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठी असलेल्या आचारसंहितेच्या कलम २.१४ नुसार फखर जमान लेव्हल ३ चा गुन्हा करताना दोषी आढळला. त्यामुळे त्याला पुढील दोन एचबीएल पीएसएल सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे. मॅच रेफरी रोशन महानामा यांनी शिस्तभंग प्रकरणाची सुनावणी घेतली. सर्व पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर निर्णय घेण्यात आला.

## अय्यर नियमभंगाचा गुन्हेगार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यर यंदाच्या आयपीएल हंगामातील नियमभंगांचा पहिला गुन्हेगार ठरला आहे. गुजरात टायटन्सविरूद्धच्या सामन्यात श्रेयस अय्यरला संथ षटक गती राखल्याप्रकरणी आर्थिक दंड ठोठावण्यात आला आहे. त्याच्या खिशातून तब्बल १२ लाख रूपये कापण्यात आले आहेत.

हा सामना चंदीगडमधील न्यू इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर झाला होता.वक्तव्यात पुढे सांगण्यात आलं की, हा या संघाचा हंगामातील पहिलाच नियमभंग असल्याने आयपीएल कोड ऑफ कंडक्टच्या आर्टिकल २.२२ अंतर्गत अय्यरला १२ लाखाचा दंड ठोठावण्यात आला आहे.

श्रेयस अय्यरवर कमी षटक गती राखल्याबद्दल कारवाई करण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या वर्षी देखील अय्यरला बीसीसीआयच्या शिक्षेचा सामना करावा लागला होता. एकदा नाही तर दोनदा हा सामना करावा लागला होता. पंजाब किंग्जने गुजरात टायटन्सविरूद्ध निसटता विजय मिळवला. गुजरातने १६२ धावा केल्या होत्या. याच्या प्रत्युत्तरात खेळताना पंजाब किंग्जने २ बाद ११० धावांपर्यंत मजल मारली होती. दुसऱ्या विकेटसाठी प्रभसिमरन सिंग आणि कूपर कॉन्नॉली यांनी ७७ धावांची भागीदारी रचली होती. मात्र यानंतर पंजाबचा डाव घसरला अन् त्यांची अवस्था ६ बाद ११८ धावा झाली. मात्र झेव्हियर बार्टलेटने डाव सावरत पंजाबला विजयाचं खातं उघडून दिलं. त्याने ४४ चेंडूत ७२ धावांची खेळी केली. इंम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळणाऱ्या गुजरातच्या प्रसिद्ध कृष्णाने १३ व्या षटकात गोलंदाजी करत मोठा धकमा केला. त्याने तीन धावात तीन विकेट्स घेतल्या.

## क्रिकेटपटू अनिल गुरव यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएलच्या थराराला सुरूवात झाली असताना मुंबई क्रिकेट विश्वातील स्टार खेळाडू अनिल गुरव यांचे निधन झाले आहे. अनेकांना हे नाव फार माहिती नसेल पण अनिल गुरव यांना क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर सर म्हणून हाक मारायचा यावरून त्यांची प्रतिभा लक्षात येते. विशेष म्हणजे सचिन तेंडुलकरने झळकवलेले पहिले शतक हे अनिल गुरव यांनी त्याला दिलेल्या बॅटने होते. सचिन तेंडुलकरचे गुरू दिवंगत रमाकांत आचरेकर यांचाही तो आवडता खेळाडू होता. अनिल गुरव यांनी त्यांच्या नालासोपाऱ्यातील राहत्या घरी त्यांनी वयाच्या ५९ व्य वर्षी अखेरचा श्वास घेतला. अनिल गुरव हे शारदाश्रम विद्यामंदिरचे विद्यार्थी होते, सचिन तेंडुलकरपेक्षा ते आठ वर्षांनी मोठे होते.

### राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

## मुंबई शहरचे संघ जाहीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने ७३ व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता मंगळवारी (दि.३१) आपले पुरुष व महिला संघ जाहीर केले. गुड मॉर्निंगच्या शार्दूल पाटीलकडे पुरुष, तर स्वामी समर्थ मंडळाच्या लेखा शिंदे कडे महिला संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली आहे.

पुरुष संघामध्ये शार्दूल पाटील (संघनायक), संकेत सावंत, साहिल राणे, ओमकार मोरे, रुपेश साळुंखे, राज आचार्य, ओमकार जाधव, अक्षय सोनी, अमन शेख, केतन मापेलकर, अमेय शिंदे, नंदिश बर्डे, तेजस वर्दम, तेजस टक्के या घेळाडूंचा तर संघप्रशिक्षक सुशील ब्रीद आणि व्यवस्थापक संदीप कांळगावकर यांचा समावेश आहे.



शार्दूल पाटील, लेखा शिंदे यांच्याकडे संघाचे नेतृत्व

महिला संघामध्ये लेखा शिंदे (संघनायिका), पौर्णिमा जेधे, साक्षी सावंत, श्रावणी घाडीगावकर, शुभदा खोत, रिया मडकईकर, वैष्णवी जाधव, रोझी डिसोझा, योगिता राऊत, सोनल नाईक, श्रुतिका शिंदे, समृद्धी माळी, प्राची भदवणकर, ऋतू परब या महिला खेळाडूंसह संघप्रशिक्षक मिलिंद कोलते आणि व्यवस्थापिका सुनीता जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

**११ जूनपासून स्पर्धा** | **सलग तिसऱ्यांदा क्वालिफायर राऊंडमधून बाहेर**

## चॅम्पियन इटली फिफा वर्ल्डकपला मुकणार

**। इटली । वृत्तसंस्था ।**

इटलीला सलग तिसऱ्यांदा फिफा वर्ल्ड कपमध्ये स्थान मिळवता आले नाही. वर्ल्ड कपच्या युरोपियन क्वालिफायर्सच्या अंतिम फेरीत त्याला बोस्निया आणि हर्जेगोविनाच्या हातून पेनल्टी शूटआउटमध्ये १-४ ने पराभव पत्करावा लागला.

फिफा वर्ल्ड कप पुढील वर्षी ११ जून ते १९ जुलै दरम्यान अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये खेळला जाईल. हा वर्ल्ड कपचा २३वा एडिशन असेल. याचे सामने १६ शहरांमध्ये खेळले जातील. पहिल्यांदाच या स्पर्धेत ४८ संघ भाग घेत आहेत आणि तीन देश एकत्र यजमानपद भूषवत आहेत.

युरोपियन क्वालिफायर्सचा अंतिम सामना आज जेनिका येथे खेळला गेला. चार वेळा विश्वविजेत्या इटलीसाठी सुरुवात चांगली झाली. सामन्याच्या १५व्या मिनिटाला मोइसे कीनने गोल करून संघाला आघाडी मि ळवून दिली. मात्र, पहिल्या हाफच्या समाप्तीपूर्वीच डिफेंडर अलेसांद्रो बास्तोनीला रेड कार्ड मिळाले, ज्यामुळे इटलीला १० खेळाडूंसह खेळावे लागले.




दुसऱ्या हाफमध्ये बोस्नियाने याचा फायदा घेतला आणि ७९व्या मिनिटाला हारिस तबकोविचने गोल करून स्कोअर १-१ असा बरोबरीत आणला. पूर्ण वेळेत आणि अतिरिक्त वेळेत कोणताही संघ आघाडी घेऊ शकला नाही, त्यानंतर सामना पेनल्टी शूटआउटमध्ये गेला.

शूटआउटमध्ये इटलीचा संघ दबावाखाली विखुरला. पियो एस्पोसिटो आणि ब्रायन क्रिस्टांटे यांनी त्यांची पेनल्टी चुकवली, तर बोस्नियाच्या एस्मिरा बाजराक्टरेविकने निर्णायक गोल करून संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. पेनल्टी शूटआउटमध्ये बोस्नियाने ४ आणि इटलीने १ गोल केला. इटलीचा डिफेंडर लिओनार्डो स्पिनजोला याने आश्चर्य आणि निराशा व्यक्त केली. तो म्हणाला, आम्ही स्पर्धेतून बाहेर पडलो आहोत आणि हे सर्व अशा प्रकारे घडले आहे यावर अजूनही आमचा विश्वास बसत नाहीये.गतविजेता अर्जेंटिनाला गट जे मध्ये ठेवण्यात आले आहे. स्पेन गट एच मध्ये, फ्रान्स गट आय मध्ये, जर्मनी गट ई मध्ये, पोर्तुगाल गट के मध्ये आणि इंग्लंड गट एल मध्ये आहे. गट एच, आय, जे, के आणि एल ला ग्रुप ऑफ डेथ मानले जात आहे, कारण यात मजबूत संघ आहेत. स्पेनच्या गटात उरुग्वे आणि सौदी अरेबियासारखे संघ आहेत, ज्यांनी मागील विश्वचषकात अनेक उलथापालथ केल्या होत्या. फ्रान्सच्या गटात सेनेगल आणि नॉर्वेसारखे चांगले संघ आहेत.

## एमपीएलसाठी खेळाडूंचा लिलाव

**। मध्यप्रदेश । वृत्तसंस्था ।**

मध्यप्रदेश क्रिकेट लीगच्या तिसऱ्या हंगामाची सुरुवात झाली आहे. एमपीएलमधील ग्रेड ए खेळाडू जसे की वेंकटेश, रजत पाटीदार, अनिकेत वर्मा आणि आशुतोष शर्मा यांना आपल्या संघात घेण्यासाठी संघमालकांमध्ये तीव्र स्पर्धा पाहायला मिळाली. प्रथमच एमपीएल लिलावात सहभागी झालेल्या आयपीएलमधील दिल्ली डेअरडेव्हिल्सचा स्टार खेळाडू आशुतोष शर्मा याच्यासाठी सर्व संघांम ध्ये चुरस होती. मालवा स्टॅलियन्सने १५ लाखांची बोली लावून आशुतोष शर्माला या हंगामातील सर्वात महाग खेळाडू बनवले. अक्षत रघुवंशी १३ लाख ८० हजार, अनिकेत वर्मा १३ लाख २० हजार, शिवांग कुमार १३ लाख, मंगेश यादव १२ लाख, माधव तिवारी १० लाख ६० हजार आणि सारांश जैन ९ लाख ६० हजारांत विकले गेले. अशाप्रकारे शेकडो खेळाडूंवर बोली लावण्यात आली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)